


# विदर्भ प्रजासत्ताक



https://epaper.vidarbhaprajasattak.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026 RNI No. - MAHMAR 2023/84526

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१९२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.२६ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## लडाखबाबत केंद्र सरकारने केली मोठी घोषणा, पाच नव्या जिल्ह्यांची केली निर्मिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६नवी दिल्ली**

एकीकडे जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकीची लगबग सुरू झाली आहे. दुसरीकडे केंद्रशासित प्रदेश असलेल्या लडाखबाबत केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने लडाखमध्ये पाच नव्या जिल्ह्यांची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी या पाच नव्या जिल्ह्यांच्या निर्मितीची घोषणा केली आहे. या घोषणेनुसार झांस्कार, द्रास, शाम, नुब्रा आणि चांगथांग या पाच नव्या जिल्ह्यांची निर्मिती करण्यात आली आहे. झांस्कार आणि द्रास हे नवे जिल्हे कारगिल विभागात असतील. तर शाम, नुब्रा आणि चांगथांग हे जिल्हे लेह विभागात आहेत.



सध्या लडाखमध्ये केवळ लडाख आणि कारगिल हे दोन जिल्हे आहेत. केंद्रीय गृहमंत्रालयाने घेतलेल्या निर्णयानंतर आता लडाखणधील जिल्ह्यांची संख्या वाढून ७ एवढी झाली आहे. लडाख विभागामध्ये अतिरिक्त जिल्ह्यांची मागणी बऱ्याच काळापासून करण्यात येत होती. लेह, लडाख आणि कारगिल विभागातील सामाजिक, राजकीय संघटना ह्या नव्या जिल्ह्यांची मागणी वारंवार करण्यात येत होती. त्यामुळे केंद्र सरकारने हा महत्त्वप्रूण निर्णय घेतला. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच लखाडमधील जिल्ह्यांची संख्या वाढवण्यात आली आहे. शासकीय व्यवस्था भक्कम करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

लडाखमध्ये पाच नव्या जिल्ह्यांची घोषणा करताना सोशल मीडियावर शेअर केलेल्या आपल्या पोस्टमध्ये अमित शाह म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या एक विकसित आणि समृद्ध लडाख बनवण्याच्या दृष्टीकोनाला पुढे नेताना केंद्रीय गृहमंत्राने पाच नवे जिल्हे निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. या पाच जिल्ह्यांच्या माध्यमातून शासन मजबूत करून लोकांसाठी आणलेल्या योजनांचे लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यात येतील.

## ४४ जणांची यादी मागे घेतल्यानंतर, समोर आली १५ नावे भाजपने किती मुस्लीम उमेदवारांना तिकीट दिले?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६जम्मू कशिमर**

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने सोमवारी (२६ ऑगस्ट) पुन्हा एकदा उमेदवारांची नवी यादी जाहीर केली आहे. यात पहिल्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीसाठी १५ उमेदवारांना उमेदवारी देण्यात आली आहे. तत्पूर्वी, सकाळच्या सुमारास भाजपने ४४ उमेदवारांची यादी जाहीर केली होती. मात्र, केवळ दोन तासांच्या आतच ती मागे घेण्यात आली आणि काही सुधारणा करून यादी पुन्हा जारी केली जाईल, असे म्हटले होते.



सकाळी १० वाजता भाजपने पहिली यादी जाहीर केली होती. मात्र, काही बदलांसह नवी यादी जाहीर करण्या येईल, असे सांगत दुपारी १२ वाजताच्या सुमारास ती मागे घेण्यात आली. यानंतर सुमारे अर्ध्या तासानंतर नवीन यादी जाहीर करण्यात आली. या यादीत १५ उमेदवारांची नावे आहेत. यापूर्वी जाहीर करण्यात आलेल्या यादीत तीन टप्प्यांसाठी ४४ उमेदवारांची नावे होती. तर नंतर जाहीर करण्यात आलेल्या नव्या यादीत पहिल्या टप्प्यातील १५ उमेदवारांची नावे आहेत.

### भाजपनं ८ मुस्लीम उमेदवारांना दिले तिकीट

भाजपने ज्या १५ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे, त्यांत ८ मुस्लीम उमेदवारांना तिकीट देण्यात आले आहे. हे मुस्लीम उमेदवार ज्या जागांवर निवडणूक लढवत आहेत, त्या अधिकांश जागा काश्मीर खोऱ्यात आहेत. यात, इंजिनिअर सय्यद शौकत मयूर अंद्राबी, अर्शीद भट्ट, जावेद अहमद कादरी, मोम्मद रफीक वानी, अधिवक्ता सय्यद वजाहत, सोफी यूसुफ, तारीक कीन आणि सलीम भट्ट यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

## बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरण: आरोपी अक्षय शिंदेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६बदलापूर**

ठाणे जिल्ह्यातील बदलापूरमध्ये लहानग्या शाळकरी मुलींच्या लैंगिक छळाच्या प्रकरणावरून राज्यात संताप व्यक्त होत आहे. आरोपींना लवकरात लवकर फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. दुसरीकडे आरोपीच्या पालकांनी आपल्या मुलाला या प्रकरणात नाहक गोवण्यात आल्याचा दावा केला आहे. याच दरम्यान, या प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे याला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.



सामान्य नागरिकांच्या उद्रेकानंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी चौकशी करण्यासाठी डखढ स्थापनेचे आदेश दिले होते. त्या टीमने तपास करत आरोपी अक्षय शिंदेच्या घरात तपासणी केली. यावेळी मोबाईलसह काही पुरावे मिळाल्याची माहिती समोर आली. अक्षयचा मोबाईलही ट्रेस करण्यात आला असून, त्यातून अनेक खुलासे होत आहेत. पुढील तपासादरम्यान अनेक महत्त्वाचे पुरावे हाती लागण्याची शक्यता आहे. त्याच मुद्द्यांवर अक्षय शिंदेला कोठडी सुनावण्यात आली आहे.

पीडित विद्यार्थिनींच्या पालकांनी पोलिसांत तक्रार दाखल करू नये, याकरता शाळा प्रशासन आणि स्थानिक पोलिसांनी त्यांच्या कुटुंबाचा मानसिक छळ केल्याचा ठपका शासनाने या प्रकरणाच्या तपासासाठी नेमलेल्या दोन सदस्यीय समितीने ठेवला असल्याचे समजते. पीडित मुलीच्या कुटुंबीयांनी अत्याचाराची माहिती सर्वप्रथम शाळा प्रशासनाला दिली होती. मात्र शाळेच्या मुख्याध्यापिकेने हा प्रकार शाळेत घडलाच नाही, कुठेतरी बाहेर घडला असावा असा दावा केला. मुलीच्या गुप्तांगाला झालेली जखम ही सायकल चालवल्यामुळेही होऊ शकते, असे म्हणत मुख्याध्यापिकेने ही घटना दडपण्याचा प्रयत्न केला. या मागील कारणाचा शोध चौकशीअंती लागेल, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, दोन शालेय मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याने मंगळवारपासून बंद ठेवण्यात आलेली बदलापूरमधील ती खासगी शाळा प्रशासक नेमल्यानंतर शनिवारी पुन्हा सुरू करण्यात आली.

## 'घरात लग्न झालं नाही तरीही फडणवीसांचा राजीनामा मागतील', नितेश राणेंचा ठाकरेंना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६मुंबई**

राज्यात सध्या महिलांवर होणाऱ्या आत्याचारावरून सत्ताधारी महायुती आणि विरोधक महाविकास आघाडीमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहे. बदलापूरच्या धक्कादायक घटनेनंतर विरोधक महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल करत राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा राजीनामा मागत आहे. यातच आज माध्यमांशी बोलताना भाजप आमदार नितेश राणे यांनी जर संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांच्या घरात लग्न झालं नाही तरीही हे लोक फडणवीस यांचा राजीनामा मागतील अशी टीका केली आहे तसेच पुन्हा एकदा दिशा सालियन प्रकरणावरून



आदित्य ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. ते आज मुंबईत माध्यमांशी बोलत होते.

माध्यमांशी बोलताना नितेश राणे म्हणाले, आज सकाळी ठाकरे गटातील दोन नेत्यांची वक्तव्य ऐकूण येथे आलो आहे, एक आहे आदित्य ठाकरे आणि दुसरे संजय राजराम राऊत आहेत. हे दोघेही महिला अत्याचार आणि विकृती आणि पोलिसांवर दबाव याबद्दल बोलत होते मात्र त्यांचे चारित्र्य पाहिलं तर त्यांनी फक्त महिला अत्याचार आणि विकृतीमध्ये पीएचडी मिळणे राहिले आहे अशी टीका माध्यमांशी बोलताना आमदार नितेश राणे यांनी केली.पुढे बोलताना आमदार नितेश राणे म्हणाले की, आज सकाळी संभाजीनगरमध्ये झालेला आंदोलन हे कोणत्या राजकीय पक्षाने केले नव्हता पण आमचे भाजप पदाधिकारी हे माणसांच्या मनातील प्रश्न विचारायला तिथे गेले होते त्या ठिकाणी आदित्य ठाकरेंनी पळ काढण्यापेक्षा बाहेर येऊन जोरात सांगायला पाहिजे दिशा सालियन प्रकरणाशी काहीही संबंध नाही कारण की मी त्या ठिकाणी नव्हतो. आदित्य ठाकरे त्या ठिकाणी आले असते तर त्यांच्या पक्षातील लोकांना लाठी खायला लागली नसती असं देखील यावेळी नितेश राणे म्हणाले. तसेच जर आदित्य ठाकरे यांनी पुरावा दिला तर मी ह्या ठिकाणी त्यांची माफी मागायला तयार आहे असेही यावेळी ते म्हणाले.

दिशा सालियान व सुशांत सिंग राजपूत हे राजकीय प्रकरण नाही. भांडूपचा देवानंद याचे स्वत:चे नाव डॉ. स्वप्ना पाटकर यांना शिवी देण्यामध्ये आहे. संजय राऊत यांनी डॉ. पाटकर यांच्यावर सुद्धा बोलावे. डॉ. स्वप्ना पाटकर हिला संजय राऊतची माणसे फोन करु सांगत आहेत की या प्रकरणात तु देवेंद्र फडणवीस यांचे नाव घे असा आरोप देखील यावेळी त्यांनी केला.

## आदिवासी बजेटचे ७ हजार कोटी लाडकी बहीण योजनेसाठी वर्ग केले का?: प्रकाश आंबेडकर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६नाशिक**

महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर केली. यानंतर या योजनेत कोट्यवधी महिलांनी नोंदणी केली. या योजनेचे जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे पैसेही लाखो महिलांच्या खात्यात जमा झाले. या योजनेसाठी महायुती सरकार राज्यभरातील विविध ठिकाणी कार्यक्रम घेत आहेत. परंतु, या योजनेवरून महाविकास आघाडीचे नेते सरकारवर टीका करत आहेत. यातच आता वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी लाडकी बहीण योजनेच्या पैशांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.



पेसा भरती व्हावी, या मागणीसाठी माजी आमदार जे. पी. गावित गेल्या चार दिवसांपासून नाशिकच्या आदिवासी विकास आयुक्तालय बाहेर उपोषणाला बसले आहेत. आदिवासी १७ संवर्गमधील पैसा कायद्यांतर्गत पदभरती करण्यात यावी ही प्रमुख मागणी त्यांची आहे. या आंदोलकांच्या भेटीला प्रकाश आंबेडकर गेले होते. यानंतर मीडियाशी बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी लाडकी बहीण योजनेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

**लाडकी बहीण योजनेला कुठून पैसे आला?**

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, दुर्दैवाने सरकारला अदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जाणीव नाही. आपले कंत्राटदार चालले पाहिजे यासाठी डीबीटी बंद केली. बोगस आदिवासी भरती आहेत असे विधानसभेत सांगितले. जे बोगस होते त्यांना खुल्या प्रवर्गात समाविष्ट केले. पण आदिवासी पेसा अंतर्गत भरती केली नाही. लाडकी बहीण योजनेला कुठून पैसे आला? आदिवासीच्या बजेटचे ७ हजार कोटी लाडकी बहीण योजनेसाठी वर्ग केले का? जर असे नाही तर सरकारने आदिवासीच्या बजेटच्या विवरण द्यावे, अशी मागणी प्रकाश आंबेडकर यांनी केली.

## राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळला; विरोधक आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६सिंधुदुर्ग**

मालवण येथील राजकोट किल्लयावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची संतापजनक घटना घडली आहे. नौदल दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राजकोट येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं होते. मात्र हा पुतळा दुर्देवाने कोसळल्याची घटना घडली आहे. पुतळा कोसळण्यामागचं कारण अद्याप अस्पष्ट आहे.



४ डिसेंबर २०२३ रोजी मालवणच्या राजकोट किल्लयावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा सलाम म्हणून हा पुतळा उभारण्यात आला होता. मात्र वर्षभरातच हा पुतळा कोसळल्याचा प्रकार उघडकीस आला. नौदल दिनानिमित्त सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पंतप्रधान मोदींच्या हस्ते या भव्य पुतळ्याचं अनावरण करण्यात आले होते. हा पुतळा कोसळण्यामागे कारण काय हे अद्याप कुणी प्रशासकीय अधिकारी सांगत नाही. मात्र विरोधकांनी आता आक्रमक पवित्र घेतला असून संपूर्ण राज्यभरात आम्ही आंदोलन करणार बोलल्या जात आहे.

## आमदार रवी राणा यांचा मतदारसंघात एस.टी. बस ने प्रवास

### भंगार एस.टी.बसेस पाहून आमदार रवी राणा संतप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती**

राज्य शासनाने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेसाठी महिला भगिनींना वारंवार एस टी ने प्रवास करावा लागतो,शालेय विदयार्थी शाळेत बस ने येणे जाणे करतात,जेष्ठ नागरिकांना सुद्धा एस टी बस शिवाय पर्याय नाही हे वास्तविक सत्य असून यांच्या व्यथा आमदार रवी राणा यांनी फेसबुक लाईव्ह च्या माध्यमातून मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांच्या समोर मांडल्या व सकाळी



७,दुपारी१२ आणी सांयकाळी ६ वाजता चांगल्या दर्जाच्या उत्तम अवस्थेतील एस टी बसेस ग्रामीण भागाकरिता उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी आमदार रवि राणा यांनी यावेळी मुख्यमंत्री एकनाथ जी शिंदे यांच्याकडे केली,सोबतच राज्य परिवहन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना फोन करून या संदर्भात तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश आमदार रवी राणा यांनी दिला. आमदार रवी राणा यांच्या एस टी प्रवासामुळे ग्रामीण भागाच्या जीवन वाहिनी असणाऱ्या एस टी ची दुरावस्था शासनाच्या निर्दशनास आली असून आता ग्रामीण भागातील नागरिकांना चांगल्या एस टी बसेस मिळून त्यांचा प्रवास सुखकर व सुरक्षित होईल असा विश्वास नागरिकांनी व्यक्त करून आमदार रवी राणा यांचे आभार मानले आहे.

## संपादकीय ......

# प्रतिभेतील महाशक्ती बनायचे तर..!

एकविसावे शतक भारताचे असेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटल्यानंतर त्याचा देशातील विकासाभिमुख असलेल्या सर्व क्षेत्रांवर व्यापक परिणाम झाला. गेल्या वर्षी आपण जागतिक आर्थिक विकासात ७.२ टक्के योगदान दिले; पण आर्थिक विकासाचा हा दर कायम ठेवताना आणि एक विकसित देश होण्यासाठी देशातील शालेय पातळीवर गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यावर लक्ष द्यायला हवे.

एका अंदाजानुसार,२०४७ पर्यंत जगभरात कार्यरत राहणारे २० टक्के मनुष्यबळ भारतीय असेल. यानुसार आपण गुणवान, कुशल आणि प्रतिभावंत लोकांची महाशक्ती होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत; पण आजघडीला या मनुष्यबळातील मोठा हिस्सा प्राथमिक वर्गात असून, तिसरी परीक्षा उत्तीर्ण होणारी सुमारे तीन चतुर्थांश मुले ओळ तर वाचू शकतात, परंतु त्या ओळीचा अर्थ समजलेला नसतो. एवढेच नाही, तर सोपे गणितही सोडवता येत नसल्याचे दिसून येते. देशाच्या विकासात शिक्षणाचे महत्त्व ओळखता २०२० मध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्यात आले. त्यात प्राथमिक शिक्षणाला सर्वाधिक स्थान देण्यात आले. या पार्श्वभूमीवर शिक्षण मंत्रालयाने २०२१ मध्ये प्राथमिक शिक्षण मिशन म्हणजेच 'निपुण भारत'ची (नॅशनल इनिशिएटिव्ह फॉर प्रोफेशिएन्सी इन रीडिंग विथ अंडरस्टँडिंग अँड न्यूमरेन्सी) सुरुवात केली. प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करता शिक्षणाच्या एकूणातच इकोसिस्टीममध्ये बदल घडवून आणला जात आहे. यानुसार सर्व शालेय मुले शिक्षणाचा अर्थ समजून घेत सोपे गणित सोडवू शकतील, या दृष्टीने प्रयत्न केले गेले. अर्थात, शालेय विद्यार्थी 'सिद्धी'च्या स्तरापर्यंत पोहोचतील असा 'निपुण'चा संकल्प आहे. त्यामुळे भारतीय शिक्षण प्रणालीला संकल्प ते सिद्धीपर्यंत नेताना शिक्षणाच्या सात स्वरांवर भर देणे गरजेचे आहे.

पहिला स्वर साधना. पहिल्या स्वरानुसार मूलभूत गोष्टींपासून सुरुवात करणे. शाळेत वर्गखोल्यांत पुरेसा प्रकाश असणे अपेक्षित आहे. खेळण्यासाठी मोठे मैदान, स्वच्छतागृहात पाण्याची सुविधा देण्यावर भर देणे. शिवाय वेगवेगळ्या वर्गांच्या अडचणी योग्यरीतीने हाताळण्याचीही समस्या असते. यावर एक तोडगा असून, शालेय व्यवस्थापनाची पुनर्रचना करत सर्व प्राथमिक शाळांतील प्रत्येक वर्गात किमान एक तरी शिक्षक असायला हवा, यानुसार नियोजन करायला हवे. शिक्षकांकडील शिक्षण सामग्रीत शिकवण्याचा आराखडा आणि कृती योजना असण्याबरोबरच विद्यार्थ्यांसाठीचा गृहपाठ आणि मूल्यांकनाचाही समावेश असावा. त्याचा पुढचा टप्पा अॅडटेक म्हणजेच उपकरणाच्या आधारे विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वाढविणे. त्यामुळे मुलांचा अध्यापनाचा कालावधी वाढवता येऊ शकतो.

# यंदा साजरा होणार दहीहंडी ऐवजी दहि-दांडी चा अभिनव उपक्रम

## पी. आर. पोटे पाटील ग्रुप मध्ये 'दही-दांडी' चे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती** - आपल्या महाराष्ट्राची संस्कृती,सण उत्सव, सामाजिक बांधिलकी विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचे काम पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती द्वारा सातत्याने केल्या जाते विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे व आपले कला कौशल्य विकसित करता यावे या हेतूने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम संस्थेमध्ये साजरे करतात.

दरवर्षी भव्य दहीहंडी महाविद्यालयात साजरा केल्या जातो परंतु यावर्षी पहिल्यांदाच 'दही-दांडी' उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा निर्णय संस्थेच्या वतीने घेण्यात आला आहे.

दही हंडी हा उत्सव एकतेचा संदेश देणारा सण आहे अलीकडच्या काळात या उत्सवाचे व्यापक स्वरूप बनले आहे. महाविद्यालयात या वर्षी दही-दांडी हा उपक्रम राबवण्याचा उद्दिष्ट असा की प्रत्येक दहीहंडीला मानवी मनोरे बनवून आपण दहीहंडी फोडत असतो पण त्या दरम्यान होणाऱ्या दुखापतीच्या घटना बघता आनंद व उत्सव साजरा करताना



गालबोट लागल्याचे प्रमाण आपण महाराष्ट्रात पहातोच आहे.

हिंदू परंपरेनुसार श्रीकृष्ण भगवान यांनी पण दही-दांडी चा प्रयोग आपल्या लिलेत केलेला आहे. माखन चोर श्री कृष्ण भगवान यांनी दही-दांडीचा प्रयोग आपल्या मित्रांना माखनचा प्रसाद मिळावा म्हणून दांडीने मटकी फोडून सर्वांना आनंद दिला. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना काही इजा न होऊ देता आणि त्यांच्या सुरक्षितेची काळजी लक्षात घेता दहीहंडी ऐवजी दहि-दांडी हा अभिनव उपक्रम पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप च्या वतीने विद्यार्थी व विद्यार्थिनीं करिता प्रथमच आयोजित करत आहोत.

कृष्ण जन्माष्टमीच्या पार्श्वभूमीवर हा अनोखा कार्यक्रम महाविद्यालयातील विविध विद्यार्थ्यांच्या क्लब च्या वतीने येत्या ३१ ऑगस्ट २०२४ महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात येत असून विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# आज जन्माष्टमी; जाणून घ्या जन्ममुहूर्त; कृष्णाचा पाळणा आणि पूजाविधी!

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक** - अंधःकारात प्रकाशाची वाट दाखवणारा, दैत्यांचा कर्दनकाळ ठरणारा, आपल्या बासुरीने सर्वांना मोहून टाकणारा आणि जगाला तत्वाज्ञाचे ज्ञानामृत पाजणारा भगवान श्रीकृष्ण याचा जन्मसोहळा अर्थात जन्माष्टमीचा उत्सव आपण दरवर्षी साजरा करतो. यंदाही २६ ऑगस्ट रोजी हा उत्सव 'गोविंदा रे गोपाळा' या गजरात पार पडणार आहे.




श्रावण वद्य अष्टमीला पूर्वरात्री भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला. रात्री १२ च्या मुहूर्तावर कृष्णाचा जयघोष करून जन्म झाला असे कथा कीर्तनातून घोषित केले जाते. फटाके फोडून, वाद्य वादन, टाळ-नामाचा गजर करून कृष्णजन्म झाल्याची वर्दी दिली जाते. या वर्षी हा उत्सव २६ ऑगस्ट २०२४, रोजी सोमवारी रात्री साजरा केला जाईल.

कृष्णाने संघटन शक्तीवर भर दिला होता. त्यामुळे हा उत्सव शक्यतो एकत्र येऊन साजरा करावा. अगदीच शक्य नसेल तर पुढे दिल्यानुसार घरच्या घरी विधिवत पूजा करावी. त्यासाठी जन्म मुहूर्ताचा काळ, पूजा विधी आणि पाळणा याबद्दल माहिती घेऊ.

देवघरातल्या बाळकृष्णाला छोटासा पाळणा करून त्यात बाळकृष्णाला जन्माच्या मुहूर्तावर पाळण्यात जोजवले जाते. नवीन वस्त्र परिधान केली जातात. हार घातला जातो. लोणी किंवा दही साखरेची वाटी देवासमोर ठेवली जाते. गुलाल, फुलं उधळून कृष्णाचा जयघोष केला जातो. केळं, पेढे, पंजिरीचा नैवेद्य दाखवला जातो. अनेक भाविक या दिवशी उपास करतात व दुसऱ्या दिवशी गोपाळकाल्याचा प्रसाद ग्रहण करून उपास सोडतात.

**कृष्णजन्माचा मुहूर्त :** २६ऑगस्टच्या रात्री १२ वाजता कृष्ण जन्माचा उत्सव साजरा केला जाईल. यात पूजेचा कालावधी ४५ मिनिटांचा असेल. साधारण ११.३० ते १२.१५ पर्यंत सर्व पूजा विधी करावेत असे सांगितले जाते.




## रात्री झोप लागत नाही ? मग हर्बल चहाचे हे प्रकार जरूर ट्राय करा

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक** - सतत स्क्रीन समोर असणे, अतिताण, अति आरामदायी जीवनशैली ही सगळी निद्रनाशाची प्रमुख कारणे आहेत. अलीकडे झोप न येणे ही अनेकांची तक्रार असते. शरीराला आराम आणि मेंदूला पुरेशी विश्रांती न मिळाल्याने अनेक आजार डोके वर काढतात. आपण बाह्य आजारांवर उपचार करत राहतो. पण शरीराशी निगडीत मूलभूत घटकांना आणि गरजांना सोयीस्कर विसरतो. पण तुम्हाला माहिती आहे का ? काही हर्बल चहा रात्री झोप येण्यासाठी मदत करतात. पाहुयात कोण कोणते चहा आहेत हे....



**कॅमोमाईल टी :**कॅमोमाईलच्या फुलांपासून हा चहा बनवला जातो. यातील एपिगोनीन या घटकामुळे निद्रानाश कमी होण्यास मदत होते. याशिवाय हा चहा ताण कमी करण्यासही मदत करतो.

**लॅवेंडर टी :** झोपेच्या आधी दिवसभराच्या ताणाचा निचरा करण्यासाठी हा चहा अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतो. ताण कमी झाल्यास आपसूकच शांत झोप लागते.

**पेपरमिंट टी :** लहानपणी पेपरमिंटच्या गोळ्या आपण सर्वांनी खाल्ल्या आहेत. मिंटचा सुगंध चित्तवृत्ती प्रफुल्लित करतो. या चहामुळे मांसपेशीवरील ताण सैलावतो. त्यामुळे रीलॅक्स वाटून झोप लवकर लागण्यास मदत मिळते.

**दालचीनी टी :**

दालचीनी हा प्रत्येक घरात आढळणारा मसल्याचा पदार्थ आहे. अनेक आजारांवर दालचीनी हे गुणकारी औषध आहे. पोटाच्या अनेक समस्यांवर दालचीनी काम करते. याशिवाय रात्री झोप लागण्यास मदत करते.

# फळमाशी एकात्मिक नियंत्रणासाठी 'हे' सात उपाय फायदेशीर

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

फळमाशी ही बहुभक्षी प्रकारची कीड असून १०० पेक्षा अधिक पिकांमध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव आढळून येतो. यात आंबा, पेरू, पपई, मोसंबी, चिकू, त्याचबरोबर काकडी, टरबूज, खरबूज, भोपळा वर्गीय पिके, तोंडली, पडवळ, दोडका, दुधी भोपळा याचबरोबर अनेक पिकांवर ही माशी दिसून येते. या माशीचा एकात्मिक नियंत्रणासाठी काय उपाययोजना करता येतील, ते पाहूयात.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

फळे पक्व होण्याआधी काढावीत. पक्व झालेली फळे गळून बागेत पडतात. त्यामुळे फळमाशीची उत्पत्ती वाढते. हे टाळण्यासाठी खाली पडलेली फळे गोळा करून नष्ट करावीत.

फळमाशीची कोषावस्था जमिनीत असते. मातीत ती २-३ सें.मी. खोलीपर्यंत आढळते. त्यामुळे फळबागेतील माती वेळोवेळी हलवून घ्यावी. जेणेकरून कोष उघडे पडून सूर्यकिरणे व पक्षांद्वारे त्यांचे नियंत्रण होते.

तुळशीमधील मिथाईल युजेनॉल या रसायनाकडे फळमाशी आकर्षित होते. त्यामुळे बागेच्या मध्ये तसेच कडेला तुळशीची झाडे लावावी.

फळमाशीच्या तोंडाच्या अवयवांची रचना अशी असते, की ज्यामुळे तिला केवळ द्रवरूप स्वरुपातील पदार्थच खाता येतात. त्यामुळे फळमाशीच्या नियंत्रणासाठी विषारी अमीषाचा उपयोग करावा.

विषारी आमिष तयार करताना गुळपाणी १ लिटर अधिक मिथाईल युजेनॉल ५ मि.लि. या प्रमाणात द्रावण तयार करून त्याचा वापर




करावा. विषारी अमिषाकडे फळमाश्या आकर्षित होऊन त्यांचा नायनाट होतो.आमिषाचा उपयोग बागेच्या कडेने तसेच झाडांवर अशा पद्धतीने एकरी २० या प्रमाणात करावा.

विशेषतः नर माश्यांच्या नियंत्रणासाठी मिथाईल युजेनॉल चार ते पाच थेंब (५ मि.लि.) कापसाच्या बोळ्यावर टाकून प्लास्टिकच्या डब्यात ठेवावेत. प्रतिहेक्टरी असे ४ सापळे लावावेत. नर फळमाश्या या सापळ्याकडे आकर्षित होऊन त्यात पडून मरतात. दर १५ ते २० दिवसांनी रसायने बदलून मेलेल्या माश्या सापळ्यातून काढून टाकाव्यात. सापळा ४-५ फूट उंचीवर टांगावा.

बहार धरण्यापूर्वी तसेच फळे लिंबाच्या आकाराची झाल्यावर हेक्टरी ४-५ रक्षक सापळे लावावेत. सापळे लावल्यामुळे बागेतील नर फळमाशीचे प्रमाण कमी होते. मादी माशीला मिलनासाठी नरांची उपलब्धता कमी होते. परिणामी मादी नराच्या शोधात अन्य ठिकाणी जातात किंवा अंडी फलीत न होण्याचे प्रमाण वाढते. **सौजन्य : कृषी विज्ञान केंद्र, मालेगाव जि. नाशिक**

# खुनातील आरोपीला हरियाणा मधून अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६दर्यापूर :** मारहाण करून दर्यापुरातील एकाचा खून करणाऱ्या हरियाणातील आरोपीला पोलिसांनी तेथून अटक केली. २५ ऑगस्ट रोजी रोहतक येथे ही कारवाई दर्यापूर पोलिसांनी केली.

पोलिस सूत्रांनुसार, अंकित ऊर्फ गोधू रणबीर धारीवाल (३२, रा. निंदाना, जि. रोहतक, हरियाणा) असे अटक आरोपीचे नाव आहे. दर्यापूर येथील सचिन भगवान पिंजरकर (२८) या युवकाला त्याच्यासह अनिल ऊर्फ टिना बलवान (रा. इस्माईल ११२ बी, सांपला पोलिस ठाणे, जि. रोहतक) यांनी दुचाकीवर बसवून नेले आणि

मारहाण करून कन्या शाळेच्या मैदानावर टाकून दिल्याची तक्रार १० जून रोजी फिर्यादी नातेवाईक सुनील ज्ञानेश्वर पाचखंडे (३४, रा. भंडारज, ता. अंजनगाव सुर्जी) यांनी दर्यापूर पोलिस ठाण्यात दाखल केली होती. उपचारादरम्यान सचिनचा मृत्यू झाला. त्यावरून दर्यापूर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला. ते दर्यापुरातील साईनगर भागात भाड्याने राहत होते.



ते गुन्ह्यात वापरलेली दुचाकी घेऊन पसार झाल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. आरोपींच्या शोधासाठी दर्यापूर पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेची पथके नेमण्यात आली होती.सहायक पोलिस निरीक्षक अभय चौथनकर यांच्या नेतृत्वातील पथकाने रोहतक येथून अंकितला अटक केली. पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी गुरुनाथ नायडू, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात व दर्यापूर ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुनील वानखडे यांच्या नेतृत्वात सहायक निरीक्षक अभय चौथनकर, उपनिरीक्षक विशाल दांदळे, जमादार दीपक रेलकर, सुधीर बावने, सिद्धार्थ आठवले, अमित वानखडे, कॉन्स्टेबल नीलेश कवटकर यांनी कारवाई केली.

# राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत गार्गी चव्हाण ठरली चॅम्पियन

## पाच मिनिटात केली १८३ बेरीज वजाबाकी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६ अमरावती-** एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या २८ व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून यामध्ये अमरावतीची गार्गी बलविर चव्हाण ही स्पर्धेची चॅम्पियन ठरली. गार्गीने पाच मिनिटांत १८३ बेरीज वजाबाकी करण्याचा विक्रम या स्पर्धेत नोंदविला आहे. अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, नागपूर, आदी जिल्ह्यातील तब्बल ९३०० विद्यार्थी या स्पर्धेला बसले होते. विशेष म्हणजे ही परीक्षा फक्त पाच मिनिटांची होती.गार्गी चव्हाण हिने अवघ्या पाच मिनिटात १८३ बेरीज वजाबाकी केली तर परीधी निमकर या विद्यार्थिनीने पाच मिनिटात १०४ बेरीज वजाबाकी करून दोघी या राष्ट्रीय स्पर्धेच्या चॅम्पियन ठरल्या. श्रीखंडे मॅडम यांची विद्यार्थिनी असलेल्या गार्गीने मिळविलेल्या या यशामुळे सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.अबॅकस मुळे फक्त विद्यार्थ्यांची गणिताची गती वाढत नाही तर त्यासोबत एकाग्रता, स्मरणशक्ती, आत्मविश्वास वाढीस लागून विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता देखील वाढते हे या स्पर्धेचे स्पष्ट केले.

देशमुख लॉन याठिकाणी स्पर्धेचे बक्षीस वितरण पार पडले. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमी विदर्भाचे संचालक अशोकराव घडेकर हे होते.

तर प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उप-कुलसचिव मीनल मालधुरे,जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीकांत उमप, उपआयुक्त विजय राहाटे, ॲड.प्रविण भुस्कुटे, प्राचार्य शिवदास आढाव इत्यादी मान्यवर विचारपिठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते गार्गी चव्हाण हिचे कौतुक करून तिला प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देऊन तिचा सत्कार करण्यात आला. चिमुकल्या गार्गीने मिळविलेल्या या यशाबद्दल सर्वत्र तिचे कौतुक करण्यात येत आहे. आपल्या यशाचे श्रेय ती आई वडील व श्रीखंडे मॅडम यांना देते.



RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २६ ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण


## आ. बच्चू कडू यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

# अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यातील अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना मिळणार नुकसान भरपाई

### अचलपूर मतदार संघासाठी सर्वाधिक २४८ कोटींचा निधी मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अचलपुर–** शेतकरी ,शेतमजूर व दिव्यांगांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या हितासाठी झटत सर्वतोपरी कार्य करणारे अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार व दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष, शेतकरी नेते बच्चू कडू यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यास मोठे यश मिळाले असून अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यातील गारपीट व अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना लवकरच नुकसान भरपाई मिळणार आहे. राज्य सरकारने अमरावती जिल्ह्यातील अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यासाठी सर्वाधिक २४८ कोटीचा निधी मंजूर केला असून आर्थिक दृष्टचक्रात सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे .मार्च व एप्रिल २०२४ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतातील उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन आर्थिक गर्तेत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा फटका बसून ते संकटात सापडले होते. या अवकाळीचा सर्वाधिक फटका अचलपूर विधानसभा मतदारसंघातील अचलपूर व चांदूरबाजार तालुक्याला बसला होता.ही गंभीर परिस्थिती बघता आमदार बच्चू कडू यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जात झालेल्या नुकसानीचा आढावा घेत शेतकऱ्यांना धीर दिला आणि राज्य सरकारकडे नुकसान भरपाईची मागणी करीत पाठपुरावा केला.मार्च – एप्रिल २०२४ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे अचलपूर मतदार संघातील अचलपूर व चांदूरबाजार या दोन तालुक्यातील जीरायत ,बागायत व फळ पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परिणामी अगोदरच आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी पुरता हवालदिल झाला असून प्रशासनाने नुकसानीचा पंचनामा करीत सादर केलेल्या अहवालावरून तत्काळ निधी उपलब्ध करून देत शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी आमदार बच्चू कडू यांनी एका पत्राद्वारे राज्य सरकारकडे केली होती. सोबतच त्या अनुषंगाने वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा देखील केला. त्यांच्या या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश येऊन २३ जुलै २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत नुकसान भरपाई पोटी देण्यात येणाऱ्या निधीस मंजुरी प्रदान करण्यात आली आणि तसा शासन आदेश २ ऑगस्ट २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला. आ .बच्चू कडू यांच्या प्रयत्नामुळे नुकसान भरपाई पोटी अचलपूर मतदार संघातील शेतकऱ्यांसाठी १५४.७८ कोटी रुपये व नव्याने यामध्ये वाढ करून अचलपूर तालुक्यासाठी ३३ कोटी ९८ लाख ४हजार २७० रुपये तर चांदूरबाजार तालुक्यासाठी ५९ कोटी ७६ लाख ६२ हजार २८० रुपये असा एकूण ९३ कोटी ७४ लाख ६६ हजार ५५० रुपयांचा सर्वाधिक निधी मंजूर झाला आहे.



#### संकटग्रस्त शेतकऱ्यांना मिळाला दिलासा

आ कडू जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी आज विविध संकटामुळे आर्थिक गर्तेत सापडला असून मार्च व एप्रिल महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेला होता. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या माध्यमातून थोडा आर्थिक दिलासा मिळावा यासाठी शासन दरबारी पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश मिळाले असून सरकारने अचलपूर मतदारसंघातील अचलपूर व चांदूरबाजार या दोन तालुक्यास सर्वाधिक २४८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. नुकसान भरपाई पोटी मिळणाऱ्या निधीमुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात का होई ना दिलासा मिळणार असून लवकरच निधी वाटपास प्रारंभ होणार असल्याची माहिती आमदार बच्चू कडू यांनी दिली.

# शहरातील खराब रस्त्यांना कंटाळून शिक्षक दांपत्याने केला स्वखर्चातून दुरुस्त



### शिक्षक दांपत्याने होत आहे कौतुक तर नगरपरिषदेच्या निष्क्रियपणाबाबत नाराजी व्यक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव शहरात काही भागातील रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते असे चित्र दिसून येत आहे.गेल्या तीन वर्षांपासून अंजनगाव नगरपरिषद मध्ये प्रशासक राज असल्याने मनमानी कारभार चालत असल्याने शहरातील नागरिक आता प्रशासक राज ला कंटाळले आहे.पावसाळ्याचे दिवस असल्याने रस्त्यावर पाणी साचत असुन मोठमोठे खड्डे पडले असल्याने अनेक वेळा किरकोळ अपघात होत आहे.अनेक वेळा नागरिक नविन रस्त्यांची तर काही ठिकाणी दुरुस्तीची मागणी करतात.मात्र, अनेक महिने उलटूनदेखील रस्त्यांची अद्याप दैना अवस्था पाहावयास मिळते. यामुळे या रस्त्याच्या अवस्थेला कंटाळून नागरिकांनी स्वतः वर्गणी करून आपल्या घरासमोरील रस्त्यांवर मुरूम टाकून घेण्यास अंजनगाव शहरात सुरुवात केलीअंजनगाव शहरातील सारडा नगरात रस्ता दुरुस्ती करण्यासंदर्भात नगरपरिषद कडे तक्रार करण्यात आली. मात्र, या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. यामुळे नगरातील सतिश घुसे व कल्पना घुसे शिक्षक दांपत्याने यासाठी पुढे सरसावले. त्यांनी स्वखर्चाने आपल्या गल्लीत होणाऱ्या नागरिकांना त्रासापासून बचाव व्हावा याकरिता पुढाकार घेऊन सर्व गल्लीच्या नागरिकांच्या सहकार्याने वर्गणी जमा करून मुरूमाचा रस्ता तयार केला.या साठी त्यांना श्रिकांत नांदुरकर शिक्षक, तसेच निलेश वाघमारे यांनी सहकार्य केले.सारडा नगराला हा रस्ता तयार केल्याने परिसरात सकारात्मक चर्चा होत असून, नगरपरिषदच्या निष्क्रियपणाबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.परिसरातील नागरिकांना या दुरुस्तीकरण झालेल्या रस्त्याचा फायदा होणार असून, काही प्रमाणात होणारा त्रास कमी होणार आहे. मात्र नगरपरिषदच्या वतीने अंजनगाव शहरातील रस्त्यांचा कायापालट कधी होणार हे मात्र अद्यापही अनुत्तरीत आहे.

# मेळघाटातील कमी वजनाच्या बालकांसाठी विशेष उपाययोजना!

## अंगणवाडी केंद्राकेंद्रात बालकांना विशेष आहार आणि औषधोपचारः संजीता मोहपात्रा





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अमरावती**

मेळघाटातील कुपोषण आणि बालमृत्यू कमी करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनामार्फत वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येतात. महिला बाल विकास विभाग आणि आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मेळघाटात काही नावीन्यपूर्ण उपक्रम सुद्धा सुरू आहेत. नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी एक दिवस मेळघाटासाठी हा उपक्रम सुद्धा राबविण्यात आला. मेळघाटातील कमी वजनांची बालके तीव्र कमी वजनात जाऊ नये आणि कुपोषित होऊ नये म्हणून महिला बाल विकास विभागामार्फत प्रत्येक अंगणवाडी केंद्रात ग्राम बाल विकास केंद्र सुरू करण्यात आले असून यामध्ये कमी वजनांची बालके दाखल करण्यात आलेली आहेत.

मेळघाटात एकूण ४७८ अंगणवाडी केंद्र आहेत. यामध्ये शून्य ते सहा वर्षे वयोगटातील जवळपास ४० हजार बालके येतात. काही बालके जन्मताच कमी वजनांचे असल्यामुळे किंवा आरोग्याच्या विविध कारणास्तव कमी वजनांचे असतात. हीच बालके पुढे कुपोषित बालकांमध्ये परावर्तित होतात. त्यामुळे अशा बालकांची काळजी घेतली तर ही बालकी कुपोषणात जाणार नाहीत म्हणून महिला बाल विकास विभागामार्फत मेळघाटातील धारणी तालुक्यातील १८०० कमी वजनांच्या बालकांवर उपचार करण्यात येत असून ही बालके या उपचाराला चांगला प्रतिसाद देत आहेत. प्रत्येक बालकांचे वजन ३०० ते ५०० ग्राम च्या दरम्यान वाढ झाली आहे. ग्राम बाल विकास केंद्रात दाखल केलेल्या बालकांना योग्य आहार आणि औषधी देण्यात येत असल्यामुळे त्यांच्या वजनात सकारात्मक वाढ होत असून पालक सुद्धा आपल्या बालकांना घेऊन आनंदाने अंगणवाडी केंद्रात येत असल्याचे डॉ. कैलास घोडके उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. बालविकास प्रकल्प अधिकारी भीमराव वानखेडे, अनिल चव्हाण आणि विस्तार अधिकारी सारंग काळे आणि अमोल आंबुलकर हे विशेषतः नियंत्रण करीत आहेत.

#### ग्राम बाल विकास केंद्रात बालकांना देण्यात येणारा अतिरिक्त आहार

१.सकाळी ६:०० वाजता.....घरचे जेवण२. सकाळी ८:०० वाजता मुगाचा शिरा ड्रायफूटसह३. सकाळी १०:०० वाजता अंगणवाडीतील आहार व लापशी४. दुपारी. १२:०० वाजता अंगणवाडीतील आहार पाच मिली तेल खिचडी५.दुपारी २:०० वाजता घरचे जेवण६.दुपारी ४:०० वाजता चिक्की / राजगिऱ्याचे दोन लाडू७.सायंकाळी ६:०० वाजता दोन अंड्यांचे आमलेट किंवा बुर्जी किंवा पुरी भाजी८. रात्री. ८:०० वाजता घरचे जेवण

मेळघाटातील कुपोषण आणि बालमृत्युला आळा घालण्यासाठी महिला बालविकास विभागाने हा सूक्ष्म नियोजन करून ग्राम बाल विकास केंद्र सुरू करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. तीव्र कमी वजनांच्या बालकांसाठी हा एक अतिशय चांगला उपक्रम असून याचा निश्चितच फायदा होईल असे मला खात्री आहे.

..**संजीता मोहपात्रा**, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती

# मोर्शी–परतवाडा राष्ट्रीय महामार्गावर खड्डे

### डांबरी रस्त्यावर वाहनचालकांना करावी लागते कसरत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६मोर्शी :** कोट्यवधी रुपये खर्च करूनबांधण्यात आलेल्या मोर्शी–परतवाडा राष्ट्रीय महामार्गावर आष्टगाव बसथांबा परिसरात मोठे खड्डे पडले आहेत. वाहनधारकांना यावरून वाहने हाकण्यासाठी कसरत करावी लागत आहे.केंद्र सरकारने राज्याच्या ताब्यात असलेले काही रस्ते स्वतःकडे घेऊन राष्ट्रीय महामार्ग घोषित केले आहेत. त्यापैकीच एक म्हणजे ३५३ जे या क्रमांकाचा मोर्शी ते परतवाडा रस्ता होय. हा रस्ता दोन वर्ष अगोदर पूर्णत्वास गेला. हा रस्ता बहुतेक ठिकाणी सिमेंट काँक्रीटचा तयार करण्यात आलेला आहे. परंतु, काही ठिकाणी हा जुनाच डांबरी रस्ता जसाचा तसाच आहे.

थोड्या प्रमाणात या डांबरी रस्त्यावरही राष्ट्रीय महामार्गप्राधिकरणाने कामे केली आहेत. परंतु, अवघ्या दोन–तीन वर्षातच या डांबरी रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. त्यापैकीच एक म्हणजे आष्टगाव बस थांब्यापासून पूर्व–पश्चिम दोन्हीकडे शंभर शंभर मीटर परिसरात मोठेमोठे खड्डे पडले आहेत.

त्यामुळे या रस्त्यावरून वाहतूक चारचाकी वाहने असो की दुचाकी असो, चालविताना कमालीची कसरत करावी लागते राष्ट्रीय महामार्गप्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करून खड्डे बुजवून द्यावेत, अशी या परिसरातील नागरिकांची मागणी आहे.

# आमदार प्रतापदादा अडसड यांनारक्षाबंधन सोहळ्यात

## १८ हजार महिलांनी बांधल्या राख्या



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ चांदुर रेल्वे** – तीन तालुक्यातील सर्व पंचायत समिती सर्कल मध्ये रक्षाबंधन सोहळा आयोजित केला होता यात १८ हजार महिलांनी आमदार प्रताप अडसड यांना राख्या बाधल्या

या कार्यक्रमाला तिन्ही तालुक्यातील भगिनीकडुन उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. भगिनीनी आमदार प्रतापदादा अडसड यांना राखी बांधून त्यांना आशीर्वाद दिले. आ अडसड यांचे दोन्ही हात राखींनी भरून गेले होते. राखी बांधणाऱ्या भगिनी या मोठया प्रमाणात सर्व सामान्य व शेतकरी कुटुंबातील होत्याशासनाने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू करून महिलांना मोठा आधार दिला आहे .रक्षाबंधना निमित्त महिला भगिनींने दिलेले आशीर्वाद व प्रेम हा माझ्या जीवनातील मोठा आनंदाचा क्षण आहे. भगिनींनी बांधलेल्या राखीच्या प्रेमाची आणि विश्वासाची जाण ठेवून, उत्साहाने, जबाबदारीने आणि आणखी जोमाने समाजसेवा करण्याची ऊर्जा मला मिळाली आहे.हा रेशमी ऋणानुबंध आयुष्यभर अतूट राहील. हा भाऊ तुमच्या प्रत्येक सुख दुःखात खंबीरपणे पाठीशी उभा राहील.अशी ग्वाही आमदार प्रतापदादा अडसड यांनी दिली.

# महिला, मुलींना सुरक्षेसाठी लायसन्स द्या, मी रिव्हॉल्व्हर देतो

### शिवसेना शिंदे गटाच्या नेत्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अमरावती –** देश, राज्यात महिला–मुलींवर अत्याचाराच्या घटना सातत्याने वाढत आहे. अशा घटना रोखण्यासाठी शासन त्या–त्या स्तरावर प्रयत्नरत आहे. मात्र मी स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली असून, सरकारने महिलांना रिव्हाल्वर हाताळण्याची परवानगी द्यावी, अमरावतीत परवानगी दिल्यास मी रिव्हाल्वर घेऊन देतो, असे वादग्रस्त वक्तव्य मूर्तिजापूरचे माजी नगराध्यक्ष तथा शिंदे सेनेचे पदाधिकारी नानकराम नेभनानी यांनी रविवारी येथे केले.बांगलादेशात हिंदूवर होत असलेल्या अत्याचारविरोधात अमरावती येथे नेहरू मैदान ते ईर्विन चौक या दरम्यान सकल हिंदू समाजाच्यावतीने विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना नानकराम नेभनानी यांनी वादग्रस्त वक्तव्य करून एकच खळबळ उडवून दिली. नेभनानी एवढ्यावरच थांबले नाहीत तर अत्याचार रोखताना मुली–महिलांच्या हातून दोन–तीन लोकं मेले तरी चालेल पण चुकीचा माणूस वाचू नये, त्याचं मी समर्थन करेल. त्यामध्ये लागणाऱ्या कोर्ट कचेरीचा संपूर्ण खर्च मी करेल, असेही ते म्हणाले. 'त्या' मुली–महिलां च्या कुटुंबीयावर काही आले तर त्यासाठी मी समोर राहील, असा विश्वास देखील नेभनानी यांनी दिला. नेभनानी हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जवळीक आहेत. ते शिंदे सेनेचे मुख्य समन्वयक तथा शिवसेना प्रणित सिंधी समाज राज्य संघटक आहेत. तसेच जिल्हा नियोजन समितीत विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्त आहेत.



# आ. रोहित पवार यांची उपस्थितीत आज जाधव पॅलेस येथे मेळाव्याचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती –** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या वतीने आज सोमवार दि.२६ ऑगस्ट रोजी निष्ठावंत कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. आ. रोहित पवार यांची या मेळाव्याला उपस्थिती असणार आहे. बडनेरा रोड वरील जाधव पॅलेस याठिकाणी सायंकाळी ५ वाजता हा मेळावा पार पडणार असून आ. रोहित पवार कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. आ. रोहित पवार दोन दिवसीय अमरावती दौऱ्यावर असून त्यांच्या आगमनाची जय्यत तयारी पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.२६ ऑगस्ट रोजी निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत त्यानंतर ते शहरात मुक्कामी राहणार असून दुसऱ्या दिवशी २७ ऑगस्ट ला सकाळी साडे नऊ वाजता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांच्या निवासस्थानी स्नेह भेट, व कार्यकर्त्यांशी संवाद व नंतर नागपूर येथे रवाना होतील. या मेळाव्याला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन पक्षाचे शहराध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख व रोशन कडू यांनी केले आहे.

# बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार; संरक्षणाच्या मागणीसाठी मोर्चा

## जय श्रीराम च्या घोषणेने परिसर दुमदुमला






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

बांगलादेश मधील सत्तांतरानंतर तेथे उफाळलेल्या हिंसाचारात हिंदूंवर अत्याचार होत आहे. या पार्श्वभूमीवर रविवारी अमरावतीत सकल हिंदू समाजतर्फे मोर्चा काढण्यात आला. तेथील हिंदूंचे रक्षण करण्याची मागणी या आंदोलनातून करण्यात आली.

खा. डॉ. अनिल बोंडे, शक्ती महाराज, माजी खासदार नवनीत राणा, माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता, लप्पीसेठ जाजोदिया, बजरंग दलचे प्रांत सहमंत्री ॲड. अमोल अंधारे, ॲड. प्रशांत देशपांडे, शिवसेना शिंदे गटाचे नानक नेभनानी आदींनी या आंदोलनाचे नेतृत्व केले.

नेहरू मैदानातून विविध घोषणा देत सकाळी साडे अकरा वाजता निघालेला हा मोर्चा राजकमल चौकात आल्यावर हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करण्यात आले. त्यानंतर इर्विन चौक स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ या आंदोलनाचा समारोप करण्यात आला. या वेळी खा. डॉ. अनिल बोंडे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच बांगलादेशचे हंगामी पंतप्रधान युनूस यांना पत्र पाठवून हिंदूंच्या रक्षणाची सूचना केली आहे. त्याला पाठिंबा देण्यासाठीच हे आंदोलन केले जात आहे. मविआचे नाव न घेता स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणवणाऱ्यांवरही त्यांनी सडकून टीका केली. बदलापूर घटनेच्या आडून ते राजकारण करत असल्याचे डॉ. बोंडे म्हणाले.या मोर्च्यात भाजपचे माजी शहराध्यक्ष किरण पातुरकर, तुषार भारतीय,जयंत डेहनकर, सचिव राजेश शेगोकार, निवेदिता चौधरी, संगीता शिंदे, अंबादेवी मंदिरचे सुरेंद्र बुरंगे, सुधीर बोपुलकर, प्रा. रवींद्र कडू, प्रा. रवींद्र खांडेकर, तैलिक समितीचे पदाधिकारी राजेंद्र हजारे, ॲड. जयंत ढोले, मनीष जोशी, अजय सारस्कर, प्रणीत सोनी, रश्मी नावंदर, सुरेखा लुंगारे व लवीना हर्षे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्यासह इस्कॉन मंदिराचे रणछोड कृष्णदास – महाराज, सुंदरनाथदास महाराज व रामानुज वैष्णवाचार्य अच्युतानंद महाराज, महाकाली मंदिराचे शक्ती महाराज, शालिकराम खेडकर महाराज, योगी अवघड जगदंब महाराज सहभागी झाले होते. आभार बंटी पारवानी यांनी मानले.

### या संघटना-पक्षांचा होता सहभाग

: - या आंदोलनात विहिंप, बजरंग दल, आरएसएस, दुर्गा वाहिनी, शिव प्रतिष्ठान,सनातन संस्था, हिंदू महासभा, अखिल भारतीय केसरी सेना आदी हिंदूवादी संस्था-संघटनांसह भाजप, शिवसेना शिंदेगट व शिवसेना (उबाठा) तसेच इतर पक्षाचे पदाधिकारी-कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### काँग्रेसला भारताचा बांगलादेश करायचा – खा. डॉ. अनिल बोंडे

बांगलादेशात १९७१ साली सात कोटी हिंदू होते. आता केवळ एक कोटी राहिले आहेत. काहींना मारल्या गेलं तर काहींचं धर्मांतरण करण्यात आलं. हिंदू जागृत नाही म्हणूनच सात कोटींचे एक कोटी झाले. राफावर दुःख व्यक्त करणाऱ्यांना हिंदूंवरील अत्याचार दिसत नाहीत का? असा सवाल बोंडे यांनी जाहीर सभेतून विचारला. बदलापुरात दोन मुलींवर अत्याचार झाले, हिंदू कधी दुर्योधन दुशासनाचा सन्मान करत नाही, उरणमध्ये यशश्री शिंदे वर अत्याचार झाला त्यावेळेला महाविकास आघाडी रस्त्यावर का उतरली नाही? अमरावतीत एका मुलीचा विनयभंग करण्यात आला. पीडित मुलीच्या कुटुंबीयांना त्रास देण्यात आला. त्यावेळी काँग्रेसचा कोणताही माणूस मदतीसाठी समोर आला नाही. यांना झेड प्लस देऊ नका पण पीडित कुटुंबीयांच्या घराला संरक्षण देण्यात यावे. नानकराम नेभनानी म्हणाले सर्वांना रिवाल्वर देतो, सर्वांचे मला माहित नाही पण पहिल्यांदा मला द्या. सर्वांना लढता आलं पाहिजे यासाठी मोदींनी अग्निविर योजना आणली पण विरोधक त्याला विरोध करतात, कारण काँग्रेसला भारताचा बांगलादेश करायचा आहे, अशी टीका खासदार अनिल बोंडे यांनी महाविकास आघाडी सह काँग्रेसवर केली.

# नांदेडचे खासदार वसंत चव्हाण यांचे निधन

## हैदराबादमधील हॉस्पिटलमध्ये घेतला अखेरचा श्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६नांदेड :** नांदेडचे काँग्रेसचे खासदार वसंत चव्हाण यांचे निधन झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. हैदराबाद येथील किम्स हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरु होते. काल मध्यरात्री त्यांची तब्येत अचानकपणे बिघडली. त्यानंतर पहाटे ३ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. वसंत चव्हाण यांच्या निधनाने नांदेड जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी खासदार वसंत चव्हाण यांची प्रकृती अचानक खालावली होती. त्यामुळं त्यांना तातडीनं हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं होतं. हैदराबाद येथील किम्स हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. वसंत चव्हाण यांना श्वास घेण्यास अडचण होत असल्यामुळं त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं होतं. तसंच, त्यांना लो बीपीचाही त्रास होत होता. हैदराबाद येथील किम्स हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरु होते. अखेर काल मध्यरात्री त्यांची तब्येत अचानकपणे बिघडली आणि त्यांची प्राणज्योत मालवली. नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात गेल्या दोन दशकांपासून प्रतिनिधित्व केल्यानंतर वसंत चव्हाण यांनी



काँग्रेसकडून लोकसभा निवडणूक लढवली होती. नुकत्याच झालेल्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसकडून त्यांनी निवडणूक लढवली होती. तत्कालीन खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा त्यांनी पराभव केला होता. तसंच, अशोक चव्हाण यांनी काँग्रेसला रामराम करत भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर काँग्रेससाठी नांदेडमधील हा विजय महत्वपूर्ण होता.खासदार होण्याआधी वसंत चव्हाण महाराष्ट्र विधानसभेवर अपक्ष आमदार म्हणून निवडून गेले होते.

त्यांनी नायगाव विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केलं होतं. तसंच, वसंत चव्हाण यांनी २०१४ मध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. याशिवाय, मे २०१४ मध्ये त्यांची विधानसभेच्या लोकलेखा समितीवर नियुक्ती करण्यात आली होती. ते जनता हायस्कूल आणि ॲग्रीचे अध्यक्षही होते.

# खळबळजनक! १५ वर्षीय मुलीवर निर्जनस्थळी अत्याचार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती :** दुचाकीने गावी सोडून देण्याची बतावणी करून एका अल्पवयीन मुलीला निर्जनस्थळी नेण्यात आले. तेथे तिच्यावर अतिप्रसंग करण्यात आला. हा प्रकार परिसरातील नागरिकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी आरोपीला चोप देऊन पोलिसांच्या स्वाधीन केले. ही धक्कादायक घटना कुऱ्हा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. महेश रमेश गोरे (२५) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून तो एका गावातील सरपंचाचा मुलगा असल्याची माहिती आहे. कुऱ्हा ठाण्याच्या हद्दीत राहणारी पीडित १५ वर्षीय मुलगी ही अमरावतीला शिक्षण घेत आहे. शनिवारी सायंकाळी ती बसची वाट पाहत अमरावती शहरातील गर्ल्स हायस्कूल चौकात उभी होती. त्यावेळी महेश हा दुचाकीने तेथे आला. त्याने पीडित मुलीला गावी सोडून देतो, असे म्हटले. महेश हा परिचयातील असल्याने ती




त्याच्यासोबत जाण्यास तयार झाली. त्यानंतर दोघे दुचाकीने गावाकडे जाण्यास निघाले. परंतु, महेशने मार्डी पोहोचण्यापूर्वीच मार्गात दुचाकी थांबविली. तो पीडित मुलीला चिखली शिवारातील निर्जनस्थळी घेऊन गेला. तेथे त्याने तिच्यावर अतिप्रसंग केला. पीडित मुलीने मदतीसाठी आरडाओरड केली. आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी तेथे धाव घेतली. हा धक्कादायक प्रकार लक्षात आल्यावर नागरिकांनी महेशला चोप दिला. त्यानंतर घटनेची माहिती कुऱ्हा पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच ठाणेदार डॉ. अनुपकुमार वाकडे यांनी आपल्या ताफ्यासह घटनास्थळ गाठले. घटनास्थळाचा पंचनामा करून पोलिसांनी महेशला आपल्या ताब्यात घेतले. या प्रकरणी पीडित मुलीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी महेशविरुद्ध बलात्कार व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. त्यानंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. मुलींच्या सुरक्षिततेविषयी पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# गायीला वाचवण्याच्या नादात

# महामार्गावर शिवशाहीचा भीषण अपघात

## २ ठार,२८ जखमी, रिलायन्स पेट्रोलपंप नजीकची घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६नांदगाव पेठ/** गायीला वाचविण्याच्या नादात नागपूर वरून अकोला कडे जाणाऱ्या शिवशाही बस चा भीषण अपघात झाल्याची घटना रविवारी सकाळी ९ वाजताच्या दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वरील रिलायन्स पेट्रोलपंप समोर घडली. घटनेत दोन जण ठार झाले असून २८ प्रवासी जखमी असल्याची प्राथमिक माहिती आहे.घटनेनंतर महामार्गावर काही तास वाहतूक विस्कळीत झाली होती. नांदगाव पेठ पोलिसांनी शर्थीचे प्रयत्न करून यावेळी अनेकांचे प्राण वाचवले. याबाबत सविस्तर हकीकत अशी की, नागपूर अकोला शिवशाही बस क्र. एम.एच.०९,इ.एम.१७७८ नागपूर वरून अमरावती येत असतांना सावर्डी नजीक असलेल्या रिलायन्स पेट्रोल पंप समोर दुभाजकावरून अचानक गायीने उडी मारल्याने तिला वाचवण्याच्या नादात चालकाचे वाहनावरून नियंत्रण सुटले आणि शिवशाही बस पलटी झाली. यामध्ये ३५ प्रवासी होते त्यापैकी दोन जण जागीच ठार झाले तर २८ प्रवासी जखमी झालेत. मृतकांमध्ये पंचफुला रामकृष्ण कांबळे (७५) रा.राजुरा, चांदूरबाजार,आदित्य लीलाधर इंगळे(२३)रा.नागपूर यांचा समावेश आहे तर जखमींमध्येरामराव आप्पा सावंत(६५) रा.तिवसा, मीरा माणिकराव कडूकर रा.अचलपूर, माणिक मारोतराव कडुकार (६५) बेगमपुरा अचलपूर, सिद्धार्थ रामकृष्ण कांबळे (५६) राजुरा चांदूरबाजार, चंद्रकलाबाई श्रावणाजी चौरे खोलापूरी गेट अमरावती,सिंधू भारत लांडगे (४६) रा. तिवसा,विना संतोष बनसोड (४८), रा. शिवनगर नागपूर, अनिकेत संतोष बनसोड (२२), रा. शिवनगर नागपूर, प्रतिभा कांबळे, माणिक मारोतराव कडूकर(६५) बेगमपुरा अचलपूर, शैला शैलेंद्र मेश्राम (६०) रा. परतवाडा, कृष्णा दिनेश पटेल (२१) रा.तिवसा,दिनेश प्रल्हाद राव वरघट (चालक) कौलखेड अकोला (४५), राधेश्याम प्रकाश साबळे (चालक)(३१) कान शिवनी अकोला,आशा विनोद खडसे वय (३८),आशा श्रीधर मेश्राम (६०) नागपूर,प्रतिभा सांगळे आदींचा समावेश आहे. यामध्ये एक तरुणी चक्क बस खाली दबली होती. आयआरबीला पाचारण करून सुद्धा क्रेन ची व्यवस्था करण्यात आली नाही त्यामुळे माजी जि.प. सदस्य विनोद डांगे यांनी त्यांच्याकडे असलेले जेसीबी तातडीने घटनास्थळी आणले व बस वर उचलून त्या युवतीचे प्राण वाचविले.

### आयआरबी वर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

महामार्गावर कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत. राष्ट्रीय महामार्ग केवळ नावालाच उरलेला आहे. जनावरे रस्त्याच्या कडेला वावर करतात आणि त्यामुळे असे अनेक अपघात याठिकाणी घडतात.आयआरबी कडे क्रेन किंवा जेसीबी कधीही उपलब्ध नसतो. मोठी यंत्रणा असून सुद्धा अपघाताच्या वेळी ती कमी पडत नसेल तर अश्या संस्थेवर दंडात्मक कार्यवाही व्हायला पाहिजे. रविवारी झालेल्या घटनेला आयआरबी प्रशासन जबाबदार असून त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा

**नितीन हटवार** प्रत्यक्षदर्शी,माजी जि प सदस्य नांदगाव पेठ

### महामार्गावरील मोकाट जनावरांना कोण यावर घालणार

राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वर रविवारी सकाळी झालेल्या अपघातामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे. लाखो रुपयांचा टोल वाहन धारकांकडून वसूल करणारी आयआरबी मात्र सुविधांच्या बाबतीत अनभिज्ञ आहे. महामार्गावर असंख्य मोकाट जनावरे फिरतात मात्र त्यांचा कोणताही बंदोबस्त करण्यात न आल्याने हा अपघात घडला. या प्रकाराला नेमकं कोण यावर घालणार हा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

# एक राखी सन्मानाची....

## शिवसेना महिला आघाडी व संकल्प सखी परिवाराचे उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती –** स्थानिक सुयोग मंगल कार्यालय रुक्मिणी नगर येथे विविध क्षेत्रात कार्यरत कर्तुत्ववान सखींसाठी सन्मानपूर्वक एक राखी सन्मानाची कार्यक्रम चांगलाच रंगला होता.कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना महिला आघाडी तसेच संकल्पसखी परिवाराच्या अध्यक्ष पुनम गोमासे, शिवसेना महिला शहर अध्यक्ष वृंदा मुक्तेवार, शिवसेना महानगर प्रमुख रश्मी तायडे, यांनी केले होते.यावेळी शहरातील कर्तृत्ववान महिला भगिनींना राखी बांधून त्यांचे समाजकार्यातील योगदान याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.यात महिला समुपदेशक मृणाल पाटील.पत्रकार व लेखीका कांचन मूरके,हिंदू जन जागृतीतकार्य करणाऱ्या अनुभूती टवलारे, जिजाऊ ब्रिगेडच्या अमृता देशमुख , मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाचे कार्य करणाऱ्या विजया चिखलकर,मेडिकल फार्मसिस्ट , व समाजसेविका भारती मोहकर,यांना राखी बांधून सन्मानित करण्यात आले. राखी बहिण भावाचे प्रेम सांगणारी तर आहेच परंतु आपल्या क्षेत्रातून कार्यकर्तृत्व गाजवणाऱ्या महिला भगिनींचा देखील राखी बांधण्याचा एक सन्मान ठरतो असे मत पत्रकार कांचन मुरके यांनी मांडले तर माझ्या समस्त महिला भगिनी ज्याप्रमाणे खडक फोडून पाणी समोर जातं तशाच महिला देखील इतर क्षेत्रासह उद्योग व्यवसायात समोर जात एका रणरागिणी प्रमाणे येणाऱ्या प्रत्येक परिस्थितीला तोंड देणाऱ्या समस्त भगिनींना माझा सलाम तसेच या कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्यांचे आभार व पुढील कार्यासाठी भरभरून शुभेच्छा कांचनताई मुरके यांनी सन्मानाला उत्तर देतांना आपले विचार मांडले.समुपदेशक मृणाल पाटील यांनी माझ्या भगिनींच्या समस्या सोडवण्यासाठी मी कायम तत्पर आहे आणि कोणतीही अडचण असो ती सोडवण्याचा मी सातत्याने प्रयत्न करत असते हीच माझी खरी सेवा आहे असे सांगितले. एक राखी सन्मानाची या कार्यक्रमा अंतर्गत महिलांकरिता विविध वस्तूंचे स्टॉल लावण्यात आले होते.या कार्यक्रमा ला शिवसेना शहर प्रमुख शारदा पैदाम , उपशहर प्रमुख रोहिणी कुंटे , संकल्प सखी स्वाती गेडे, वैशाली अरोकर , खुमा , अश्विनी मॅडम तसेच परिसरातील असंख्य महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.-

# नवनियुक्त जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांचे जंगी स्वागत

## पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतकांनी मोटरसायकल रॅली काढून केले स्वागत





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या अमरावती ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी श्री. संतोष महात्मे यांची नियुक्ती झाली. नियुक्तीनंतर प्रथम शहर आगमना निमित्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पदाधिकारी, कार्यकर्ते व त्यांच्या हितचिंतकांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, इरविन चौक येथे पुतळ्यास हार अर्पण करण्यात आला.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अमरावती जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी इरविन चौक येथून भर पावसा मध्ये मोटरसायकल रॅलीची सुरवात करण्यात आली. गाडगे नगर येथील गाडगे महाराज समाधीचे दर्शन घेऊन परिसरातून मोटरसायकल रॅली काढण्यात आली. सदर रॅलीचा समारोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या सुरेखाताई ठाकरे यांचे निवासस्थानी करण्यात आला. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तथा संतोष महात्मे यांची हितचिंतक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी निखिल ठाकरे, राजेश बर्वे, रवींद्र गोरठे, मेघशाम करडे, मुन्नाभाऊ मस्के, राजेश महात्मे, प्रविण भुजाडे,बाळा साखरे, जानराव कोकरे, हरिभाऊ शिंदे,अजीजभाई संजय गुजर, अनिस भाई, रींकूभाऊ शुक्ला ,राजुभाऊ बोडखे रोहीत पांडे रुशिकेश बारब्दे मोंटूभाऊ, मोहण महात्मे शकील अन्सारी, अलीमास्तर यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते

# आ.रवि राणा यांच्या हस्ते नवी वस्ती प्र.क्र.२२ मधिल युवा स्वाभिमान पार्टीच्या २७ महिला शाखेचे उद्‌घाटन

## बहिणी म्हणाल्या आम्ही रवी भाऊ यांच्या पाठीशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

गेल्या १५ वर्षापासून आ.रवि राणा हे महिलांच्या आर्थिक उत्थानाकरिता व त्यांना न्याय देण्याकरिता सदैव पाठिशी राहून विविध माध्यमातून मदत करीत असतात. त्यामुळे आ.रवि राणा खऱ्या अर्थाने हे आम्हा सर्व महिलांचे भावासारखे पाठीराखे असून त्यामुळेच शेकडो महिला आ.रवि राणा यांच्या युवा स्वाभिमान पार्टीशी जुळत असल्याचे दिसून येत आहे. त्या अनुषंगानेच नुकताच नवी वस्ती प्र.क्र.२२ मधिल अनेक परिसरामध्ये शेकडो महिलांच्या उपस्थितीत आ.रवि राणा यांनी युवा स्वाभिमान पार्टीच्या शाखेचे उद्धाटन केले. या उद्धाटनाप्रसंगी महिलांनी आवर्जून सांगितले की आमचा आशीर्वाद नेहमी रविभाऊ राणांच्या पाठिशी



असून आम्ही नेहमी त्यांच्या सोबत असल्याचा संकल्प यावेळी केला. तसेच आ.रवि राणा यांनी सुद्धा युवा स्वाभिमान पार्टीशी जुळलेल्या सर्व महिला पदाधिकारी आर्थिक दृष्ट्या व इतर माध्यमातून मजबूत होण्याच्या उद्देशाने ज्या ज्या ठिकाणी शाखेचे उद्धाटन झाले त्या त्या ठिकाणच्या शाखेच्या अध्यक्ष व इतर महिला पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून शाखेच्या परिसरातील विकास कामे सुचविण्या संदर्भात आ.रवि राणा यांनी उपस्थित महिला भगिनींना सांगितले. झंझाळपुरा, वरुडा, श्वेता कॉलनी, बालाजी नगर, श्रीराम नगर, हमालपुरा, पवन नगर, लड्ढा प्लॉट, शारदा नगर, मिलचाळ, पाचबंगला, रेल नगर इत्यादी परिसरामध्ये युवा स्वाभिमान पार्टीच्या शाखेचे उद्धाटन संपन्न झाले. यावेळी अजय जयस्वाल, नवी वस्ती प्रभाग अध्यक्षा विजया घोडेस्वार, नुतन वासनिक, संध्या रामटेके, सोनल जगदळे, सीमा राऊत, वंदना पवार, संगिता बरमैय्या, अंजली मोकासे, पाटेकर ताई, संगिता वैद्य, नंदा गुप्ता, बबिता तिवारी, मिलन साहु, संगिता वासनिक, सुमन वानखडे, पुजा दिहाडे, अरुणा जाधव, रजनी डोंगरे, प्रतिक्षा मेश्राम, वरुडा अध्यक्षा रेखा मुळे, दिपाली सहारे, पुष्पा दुबे, स्वप्नाली गायधने, शितल अळसपुरे, कोमल कावलकर, शालिनी कळोकार, वर्षा कयकाडे, लता बिसने, वर्षा काळसरपे, सविता बनसोड, विजया नांदुरकर, आरती मानके, छाया मिलखे, सुचिता पाटील, रत्नमाला मुटघरे, मंगला खोब्रागडे, मनिषा बागडे, सुदिन दिगडे, बबिता भुरे, अश्विनी गोसावी, ममता मेश्राम, ललिता गवई, सुमन वानखडे, अश्विनी गोसावी, वैशाली गायकवाड व अंसख्य महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# टोमॅटोची 'लाली' उतरली मात्र अन्य भाज्यांचे दर वाढलेत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

जुलै महिन्याच्या प्रारंभी शंभरी गाठलेल्या टोमॅटोच्या दरात बऱ्यापैकी घसरण झाली आहे. अमरावती शहरातील किरकोळ बाजारात आता ४० रुपये किलो दराने टमाटरची विक्री सुरू आहे. परंतु, अन्य भाज्यांच्या दरात वाढ झाली असून चढ-उतार सुरू आहेत. श्रावण मुळे भाज्यांना मागणी वाढली आहे.

भाज्यांच्या दरात १० ते २० रूपयांची वाढ झाली आहे. यामुळे शहरातील सर्वसामान्यांचे बजेट वाढले आहे. बाजारात सध्या कांदा ५० रुपये किलो तर बटाटा ४० रुपये किलो दराने विकण्यात येत आहे. लसणाचे दर सर्वाधिक असून ४५० रुपये किलो दराने विकण्यात येत आहे. शेवगा १०० ते १२० रुपये किलो तर गवार शेंग अद्याप १०० रूपये किलो दराने विकली जात आहे.उद्या मंगळवारला श्रीकृष्ण जन्माटमीचा सण असल्याने शहरात रविवारच्या आठवडी बाजारात चांगलीच गर्दी पहावयास मिळाली. कोथिंबिरीचे दर चांगलेच वधारले असून २०० रूपये किलोवर पोहचले. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे भाज्यांचे नुकसान झाल्याने उत्पादकता घटली आहे. त्यातच आता सणवार असल्यामुळे भाज्यांना मागणी आहे.भाज्यांचे दर वाढल्याने हातावर पोट भरणाऱ्या गरिबांचे आर्थिक बजेट चांगलेच अडचणीत आले.अळूची पाने खाने आरोग्यासाठीही फायद्याचे असल्याने अळूच्या पानांना मागणी आहे. शिवाय, प्रत्येकच सणवाराला अळूच्या पानांची वडी तसेच पातळ भाजी नैवेद्यात ठेवली जाते. यामुळे अळूच्या पानांना मागणी असून सध्या १०-२० रुपये जुडीनुसार अळूची पाने विकत मिळत आहेत.

# स्व नानासाहेब देशमुख यांचा स्मूर्तीदिन जिल्ह्यात सामजिक उपक्रमाने साजरा

## जब तक सुरज चांद रहेंगा स्व नानासाहेब वसुधाताई तुम्हारा नाम रहेगा : यशोमतीताई ठाकूर यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ चांदुर बाजार**

पिपल्स वेलफेयर सोसायटी संस्थापक अध्यक्ष स्व नानासाहेब देशमुख यांचा ११ वा स्मृतिदिन जिल्ह्यातील अनेक ठिकाणी साजरा करण्यात आला गोर गरीब गरजु विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे हा नेहमी त्यांचा उद्देश राहिला आहे त्या मध्ये अनेक ठिकाणी गरजू विद्यार्थ्यांकरिता शाळा ,कॉलेज उभारण्यात आले असे अनेक सामाजिक उपक्रम स्व नानासाहेब यांनी आपल्या कार्य कीर्ती मध्ये उभारले त्या आठवणीला उजाळा



देण्याकरिता चांदुर बाजार येथे ११ व्या स्मृतिदिनी भव्य रक्तदान शिबिर नारायण महाविद्यालय चांदुर बाजार यांच्या वतीने त्यांच्या श्रद्धांजली ठिकाणी राबविण्यात आले

सर्वांनी रक्तदान करून नानासाहेब यांना श्रद्धांजली वाहली तर गोर गरीब आदिवासी गरजू मुलांना राहण्याची सोय उपलब्ध व्हावी या करिता वसुंधरा आदिवासी आश्रम शाळा जिजाऊ मुलींचे वसतीगृह या ठिकाणी इमारतीच्या उदघाटन जिल्ह्याच्या नेत्या माजी पालकमंत्री यशोमतीताई ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. मेळघाट मधील दुर्गमभाग बोरी ता. धारणी येथील आदिवासी मुलींच्या उत्तम अशी निवासाची व्यवस्था व आदिवासी मुलामुलींचे शिक्षणाची व्यवस्था स्व नानासाहेब व वसुधाताई देशमुखांनी केली व आदिवासीना मुख्यप्रवाहात आणले व आदिवासी मुलींसाठी इतके सुंदर वसतिगृह उभारल्याचा त्यांनी आनंद व्यक्त केला याप्रसंगी अमरावतीचे माजी महापौर. विलासभाऊ इंगोले यांनी वसुधाताई यांनी जिल्हाचा कसा विकास केला व नानासाहेब यांनी समाजातल्या सर्व वर्गाना कसा न्याय दिला हे सांगितले मा गणेशराय माजी नगरअध्यक्ष चांदुर रेल्वे यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रम अध्यक्षस्थानी श्रीमती वसुधाताई देशमुख माजी पालकमंत्री होत्या त्यांनी आपल्या अध्यक्षशिय भाषणात गाडगे महाराज, तुकडोजी महाराज, डॉ भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या विचारावर आम्ही चालत आलो व समाजाची सेवा केल्याचे सांगितले कार्यक्रम ला राजेंद्र महल्ले, गणेश रॉय, दयाराम काळे, महेंद्र गहेलवार, राहुल येवले, अनिकेत ढेंगळे, चिमोटे, दारासिबे, पटेल, कार्यक्रम प्रास्ताविक संस्थेचे सचिव प्रा अभय देशमुख यांनी केले व सदर आयोजनाबाबत माहिती दिली कार्यक्रम संचालन वसुले सर यांनी केले असे अनेक सामाजिक व मदत कार्य उपक्रम जिल्ह्यातील अनेक ठिकाणी स्व नानासाहेब देशमुख यांच्या स्मृतिदिनी साजरे करण्यात आले.

# राज्यातील मागासलेल्या भागांचा अनुशेष दूर करा; डॉ. विजय दर्डा यांची राज्यपालांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

विदर्भ, मराठवाडा, खान्देश आणि कोकणासह महाराष्ट्रातील सर्व मागासलेल्या प्रदेशांचा अनुशेष दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची विनंती लोकमतच्या एडिटोरियल बोर्डाचे चेअरमन आणि माजी खा. डॉ. विजय दर्डा यांनी शनिवारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे केली. विदर्भातील रस्त्यांचा वाढता अनुशेष, आदिवासी भागांचा विकास आणि महाराष्ट्रातील शाळांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत त्यांनी राज्यपालांशी सविस्तर चर्चा केली.

डॉ. दर्डा यांनी राज्यपाल राधाकृष्णन यांची राजभवन येथे भेट घेतली आणि अर्ध्या



तासाच्या या भेटीत त्यांच्याशी राज्यातील विविध विषयांवर चर्चा केली. राज्यातील प्रमुख शहरांमध्ये झोपडपट्ट्या उभ्या राहिल्या असून, जोपर्यंत या झोपड्यांच्या पुनर्वसनाचा योग्य कार्यक्रम सुरू होत नाही, तोपर्यंत झोपडपट्टीवासीयांचा प्रश्न आणि नव्या झोपडपट्ट्यांचा प्रश्न सुटणार नाही, असे डॉ. दर्डा यांनी राज्यपालांना सांगितले.

नुकत्याच घडलेल्या महिला अत्याचाराच्या दुर्दैवी घटना आणि राज्यातील काही शाळांमध्ये घडलेल्या अस्वस्थ करणाऱ्या घटनांबाबतही बैठकीत चर्चा झाली. राज्यपालांनी डॉ. दर्डा यांनी मांडलेले मुद्दे गांभीर्याने घेतले असून, या समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

# अमरावतीचे विकासचक्र गतिमान करण्यासाठी सर्व समावेशक जनतेची साथ मोलाची- आ.सौ. सुलभाताई खोडके

## श्याम नगर परिसराच्या बैठकीला महिला, युवक व जेष्ठ नागरिकांचा उदंड प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

अमरावती शहर हे संत, साहित्य ,सभ्यता व संस्कृतीचा ऐतिहासिक वारसा लाभलेले शहर आहे. येथील भौगोलिक परिस्थिती, नैसर्गिक संसाधनांची उपलब्धता, मुलभूत सोयी-सुविधा व दळण -वळण ,आरोग्य सेवा आदी बाबींमुळे अमरावती नगरीचे जनजीवन सुखावले आहे. असे असले तरी आजच्या बदलत्या स्पर्धेच्या व गतिमान युगात गुणात्मक व दर्जात्मक सुविधा उपलब्ध करून नागरिकांचे जीवनमान उंचावणे निकडीचे बनले आहे.अमरावती शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार लक्षात घेता सर्वच नागरी वसाहती भाग व लोकवस्ती, निवासी क्षेत्रात नागरिकांच्या अपेक्षेनुरूप पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. विकासाच्या संकल्पनेत मुलभूत विकास म्हणजेच नागरी भागात सुसज्ज रस्ते, सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य व्यवस्था, पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा , शैक्षणिक कार्य तसेच सौंदर्यीकरण व सुशोभीकरण, खुल्या मैदानांना चेन्लिंग -फेन्सिंग व क्रीडांगण विकासातून शाश्वत विकासाला बळकटी देणे महत्वाचे आहे.गेल्या






चार वर्षांपासून अमरावतीकर जनता विकासाचे पर्व अनुभवत आहे. हेच विकासाची शृंखला अबाधित राखून विकासचक्र अधिक गतिमान करण्यासाठी आपण कटिबद्ध असून यामध्ये सर्वसमावेशक जनतेची लाभणारी साथ मोलाची ठरू पाहत असल्याचे मनोगत आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी व्यक्त केले.

रविवारी दि २५ ऑगस्ट २०२४ रोजी रोजी श्याम नगर परिसराची बैठक कामगार भवन येथे पार पडली. याबैठकीला श्याम नगर, राजेन्द्र कॉलनी, किशोर नगर ,वनराई मार्ग, परिसरातील नागरिक, महिला व युवक तसेच जेष्ठ नागरिक यांची मोठी उपस्थिती होती. स्थानिक श्यामनगर परिसरामध्ये आमदार सौ. सुलभाताई खोडके यांच्या प्रयत्नातून कोट्यावधीचा निधी उपलब्ध झाल्याने परिसरात अंतर्गत रस्त्यानी कात टाकली असून खुल्या मैदानांना चैनलिंग फेन्सिंग व सौंदर्यीकरण करण्यात आल्याने स्थानिकांना चांगली सुविधा मिळाली आहे. या बद्दल स्थानिक परिसरवासीयांनी आमदार महोदयांचे स्वागत व सत्कार करीत अभिनंदन केले.

गतकाळात आमदार महोदयांच्या पुढाकाराने शहराचे चित्र पालटले असून विकासपर्व नांदताना दिसत आहे. त्यामुळे आगामी काळातही आमची सुलभाताईंना साथ राहणार असल्याचा निर्धार स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला. यावेळी उपस्थिनांना मार्गदर्शन करतांना जेष्ठ मार्गदर्शक संजय खोडके म्हणाले की, आरोग्य , शिक्षण , रस्ते निर्मिती,पाणी पुरवठा क्रीडा सुविधा, तसेच सरकारी अन्न -धान्याची पूर्तता , लाभांच्या योजना आदी बाबी या स्थायी विकासाशी संलग्नित असून सर्व स्तरातील जनतेला याचा उपयोग घेता येतो. अमरावती शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लवकरच सुरु होणार आहे. त्यामुळे येथे शिक्षण घेणारा विद्यार्थी हा देशातील कुठल्याही भागातील असू शकतो, परंतु येथील चांगल्या आरोग्य सुविधा व उपचार याचा लाभ सर्व नागरिकांना होणार असल्याचे ते म्हणालेत.गतकाळात झालेला शाश्वत विकास हीच परिवर्तनाची नांदी ठरली असल्याचे मनोगत संजय खोडके यांनी व्यक्त केले. या बैठकीला कार्यक्रमाला स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोळ्यावर महागाईचे सावट, हातचा पैसा गेला निघून

## अतिपावसमुळे संकट शेतकरी सापडले चिंतेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असलेला बैलपोळा सण तोंडावर येऊन ठेपला आहे. पोळ्याच्या तोंडावर दुष्काळी परिस्थिती दिसत आहे. पावसामुळे शेतकरी जेरीस आले आहे. निंदण, फवारणीत हातचा पैसा निघून गेला आहे. त्यात महागाई वाढतीवर आहे. त्यामुळे पोळ्यावर महागाईचे सावट पसरले असून, हा सण कसा साजरा करावा, या चिंतेत जिल्ह्यातील बळीराजा सापडला आहे.

सुरुवातीला पावसाने विलंब केला. त्यामुळे पेरणी रखडली होती. नंतर पावसाअभावी पेरणी उलटण्याची स्थिती निर्माण झाली होती. आता अति पावसामुळे शेतातील पिके पिवळी पडणे सुरू झाले आहे. त्यामुळे बळीराजा चिंतातुर दिसत आहे. पीक हातात येईपर्यंत आपल्याला उत्पन्न

कती होईल, या विचाराने ते बेजार बले आहे.जिल्ह्यात



अति पावसामुळे ओल्या काळाची स्थिती निर्माण झाली आहे. ब्लीकडे दररोज पाऊस लावत आहे. बामुळे शेतकऱ्यांच्या नाकीनऊ आले आहे. त्यातच बाजारात साहित्याचे दर वाढले आहेत. पोळ्यात बैलांना सजवून नेले जाते. मात्र, साज साहित्याचे भाव वाढले आहे. त्यामुळे खरेदीकडे सध्या शेतकऱ्यांनी पाठ फिरविली आहे. पोळा हा बळीराजासाठी महत्त्वाचा सण असतो. लेकराप्रमाणे जपलेल्या बैलांना या दिवशी सजवून पोळ्यात नेले जाते.त्यांची आदल्या दिवशी खांद शेकणी केली जाते.

वर्ष हिच 'सर्जा-राजाची' जोडी बळीराजाला धीर देते. शेतकऱ्यांच्या डोळ्यातील स्वप्नांना आकार देते. त्यामुळे बळीराजही पोळ्याच्या दिवशी त्यांची मनोभावे पूजा करतो. त्यांनापुरणपोळीच नेवैद्य लावतो. त्यांना साजवितो. मात्र, यंदा बैलांना सजविण्यासाठी असलेल्या साहित्याचे भाव गगनाला भिडले आहेत, तरीही बैलाला सजविण्याचे साहित्य बळीराजाला विकत घ्यावेच लागणार आहे.



### साजाचे भाव भिडले गगनाला

सर्जा-राजाला सजविण्यासाठी विविध साहित्य लागते. त्यात रंगीबेरंगी कासरे सव्वाशे रुपयांपर्यंत, तर बिकनी गाँडे ५० रुपये, बाशिंग जोडी ११० ते ५०० रुपये, वेसन ७५ ते ९० रुपये दराने विकली जात आहे. गोडे झुल्यासाठी १५० रुपये, तोडे व घुंगरे ५०० रुपये जोडी, मटाटी १०० ते १२५ रुपये जोडीवर पोहोचली आहे. सोबत पेपर, गेरू, ऑइल पेंट आदींचे दर वाढले आहे. भाव दुप्पट झाल्याने शेतकऱ्यांचा पोळा महागाईच्या विळख्यात सापडला असल्याची भावना शेतकऱ्यांतूनव्यक्त होऊ लागली आहे.

पोळ्यासारखा सण तोंडावर येऊन ठेपला आहे. त्यात पावसाने फजिती केली आहे. त्यामुळे शेतकरी हताश झाले आहे. पीक जाते की राहते, अशी स्थिती निर्माण झाली आहे. आणखी पाऊस आल्यास शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरणार नाही. सोयाबीन, तूर, कापूस पिकाचे अति पावसामुळे नुकसान होऊ शकते. याच दिवसात पोळा सण आल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंता दिसून येत आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतकरी चिंतातुर आहे. पूर्वी १५ ते २० दिवसां-आधीच शेतकरी बैलांना सजविण्याच्या कामी लागायचे. मात्र, आता बैलांची संख्याही घटली आहे.

# सक्षम उमेदवार भाजपकडे असतांना 'आयाराम' कशाला?

## भाजप पदाधिकारी,कार्यकर्त्यांची वरिष्ठांसह प्रदेशाध्यक्षांकडे आग्रही मागणी



विधानसभेच्या तयारीसाठी बैठकांचे सत्र सुरू आहे. त्याअनुषंगानेच २१ ऑगस्ट रोजी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यात अमरावती विधानसभेबाबत चर्चा झाली. अमरावती हा भाजपचा परंपरागत मतदारसंघ आहे. ही जागा भाजपलाच मिळावी, अशी आग्रही मागणी पदाधिकाऱ्यांची आहे. वरिष्ठांना तसे कळविले आहे. अमरावतीतून कधीही एनसीपी निवडून आलेली नाही.

**– शिवराय कुळकर्णी, प्रदेश प्रवक्ते भाजप.**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

दिवाळीनंतर राज्यात विधानसभा निवडणूक होणार आहे. त्याअनुषंगाने महायुती, महाविकास आघाडीसह इतरही राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी चालविली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी जागा वाटपाची चर्चा अद्याप सुरू व्हायची असली तरी महायुतीतून अमरावती विधानसभा मतदारसंघ हा अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडे जाण्याचे संकेत आहेत; मात्र अमरावती हा भाजपलाच हवा, अशी आक्रमक भूमिका पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी वरिष्ठांकडे मांडल्याची माहिती आहे. मोर्शी सुद्धा भाजपलाच पाहिजे, अशी मागणी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे गत दोन दिवसांपूर्वी करण्यात आली, हे विशेष.विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपने मतदारसंघनिहाय उमेदवारांची चाचपणी सुरू केली आहे. त्यानुसार बुधवारी (दि. २१) बडनेरा मार्गालगतच्या 'मान सरोवर' येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत राष्ट्रीय संघटन मंत्री शिवप्रकाश, मध्य प्रदेशचे मंत्री प्रल्हाद पटेल, विदर्भ संघटन डॉ. उपेंद्र कोठेकर हे प्रामुख्याने हजर होते. या बैठकीला प्रमुख कार्यकर्ते व प्रमुख पदाधिकारी यांचे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मते जाणून घेण्यात आली. या बैठकीत अमरावती मतदारसंघात उमेदवारीवरून प्रचंड खल झाले. महायुतीतून अमरावती मतदारसंघ हा भाजपच्याच वाट्याला हवा. सक्षम आणि लोकाभिमुख चेहरा असलेला उमेदवार भाजपकडे असल्याचा दावा करण्यात आला. अमरावती हे विभागीय केंद्र असून, परंपरागत भाजपचा अमरावती मतदारसंघ हा हक्काचा आहे. त्यामुळे अमरावती विधानसभेची जागा ही भाजपलाच मिळावी, असा हट्ट यावेळी वरिष्ठांपुढेधरला गेला. किंबहुना वरिष्ठांनी स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता अमरावती विधानसभेचा निर्णय घेतल्यास लोकसभेसारखे परिणाम पक्षाला भोगावे लागतील, अशी रोखठोक भूमिका भाजपजनांनी घेतल्याची विश्वसनीय माहिती आहे. हा प्रकार होत नाही तोच दोन दिवसांनी शुक्रवारी (दि. २३) भाजपचे प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावतीत लोहाना महाजन वाडी येथे आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने – बैठक घेतली. या बैठकीला सुद्धा भाजपचे प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. यात अमरावती विधानसभेची जागा ही भाजपलाच मिळावी, अशी आग्रही भूमिका अनेकांनी येथेही घेतली. अमरावती हाभाजपचा बालेकिल्ला आहे. कार्यकर्त्यांची मजबूत फळी असून, सक्षम उमेदवार भाजपकडे असताना 'आयाराम' कशाला? असा सवाल बावनकुळे यांच्या पुढ्यात उपस्थित केला. दरम्यान, १० ते १५ कार्यकर्त्यांनी आ. बावनकुळे यांना अमरावती मतदारसंघावरून जाब विचारत जणू त्यांना घेराव केल्याचे चित्र निर्माण झाले होते.

# अमृता फडणवीसांनी नेभनानी यांच्या मागणीला दर्शवला विरोध

## समाज म्हणून अशा दानवी लोकांचा बहिष्कार करायला हवा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ नागपूर**

बदलापूरमध्ये नुकत्याच घडलेल्या चिमुकल्या मुलींवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेमुळे महाराष्ट्रभर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे. एकीकडे आरोपीला कठोर शिक्षेच्या मागणीसाठी नागरिक आक्रमक झाले असताना दुसरीकडे महिलांच्या संरक्षणासाठीच्या उपाययोजनांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे गटाच्या एका नेत्यानं थेट महिलांना स्वसंसरक्षणासाठी रिवॉल्व्हर देण्याची



मागणी केल्यानंतर त्याबाबत आता राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. दरम्यान, एका कार्यक्रमादरम्यान माध्यमांशी बोलताना अमृता फडणवीसांनी नेभनानी यांच्या मागणीला विरोध दर्शवला आहे. मला वाटतं स्वसंरक्षण आवश्यक आहे. पण मी शस्त्र वापराच्या विरोधात आहे. मला वाटत नाही तो यावरचा दीर्घकालीन उपाय ठरू शकेल. आपण तात्कालिक उपायाकडे न पाहाता दीर्घकालीन उपायाकडे पाहिलं, तर आपल्याला समाज म्हणून अशा दानवी लोकांचा बहिष्कार करायला हवा. पोलिसांनी तातडीने कारवाई करायला हवी. सरकारनं तातडीनं कारवाई करावी. आपल्या महिलांचा आदर करायला शिकवणं जास्त गरजेचं आहे, असं अमृता फडणवीस म्हणाल्या.

# श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या सोहळ्यासाठी मंदिरे सजली!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

शहरासह परिसरातील श्रीकृष्ण मंदिरांमध्ये जन्माष्टमीनिमित्त आज सोमवारी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाची तयारी शहरातील विविध श्रीकृष्ण मंदिरांसह घरोघरी दिसून आली. जन्माष्टमीच्या पूर्वसंध्येला श्रीकृष्ण मंदिरे सजवण्यात आली असून, मंदिरांवर आकर्षक फुलांची सजावट व रोषणाई करण्यात आली आहे.दरवर्षी, हा उत्सव पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा केला जातो. यंदाही शहरातील श्रीकृष्ण मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## शहरातील श्रीकृष्ण मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त कौंडण्यपूर येथील रुक्मिणी द्वारकाधीश मंदिरासह शहरातील ५ मंदिरांमध्ये सोमवारी मध्यरात्री जन्माष्टमीचा सोहळा अनुभवता येणार आहे. दरम्यान जन्माष्टमीनिमित्त शहरात तीन ठिकाणी दहीहंडी स्पर्धाही होणार आहे. ही स्पर्धा २८ ऑगस्ट आणि १ व ४ सप्टेंबरला होईल.

माता रुक्मिणीचे माहेरघर असलेल्या कौंडण्यपुरात जन्माष्टमीचा सोहळा भक्तिभावाने साजरा केला जातो. दरम्यान अमरावती येथील माता खिडकी



येथील श्रीकृष्ण मंदिर, राधानगर येथील इस्कॉन मंदिर, कंवरनगर येथील महानुभाव आश्रम आणि जवाहर गेटच्या आतील राधाकृष्ण मंदिरातसोमवारी रात्री श्रीकृष्ण जन्माचा सोहळा रंगणार आहे. माता खिडकी येथील श्रीकृष्ण मंदिर हे सर्वात जुने मंदिर आहे. येथे जाण्याचा मार्गचिंचोळा असला तरी मंदिराचा परिसर मोठा आहे. त्यामुळे दर्शनासाठी आलेल्या नागरिकांना काही काळ तेथेच थांबून आपल्या मनोकामनाही व्यक्त करता येतात. दरम्यान जन्माष्टमीच्या पूर्वसंध्येला रविवारी सायंकाळी येथे पाने-फुले आणि पताकांद्वारे सजावट करण्यात येत होती.

जन्माष्टमीच्या या सोहळ्यानंतर २८ ऑगस्टला गाडगेबाबा समाधी मंदिरासमोरील मैदानात गोविंदांचा थरार अनुभवायला मिळेल. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या दहीहंडी स्पर्धेचे आयोजन केले असून, ती दुपारी २ वाजता सुरू होईल. त्यानंतर १ सप्टेंबरला अमरावतीची ऐतिहासिक दहीहंडी फुटणार आहे. आ. रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षातर्फे ही स्पर्धा नवाथे प्लॉटवर सकाळी ११ वाजता सुरू होईल. ४ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता पुन्हा एकदा गाडगेबाबा समाधी मंदिरासमोरील मैदानात शिवसेनेच्या शिंदे गटातर्फे दहीहंडी स्पर्धा होईल.

# सणा सुदीच्या दिवसात हृदयस्थळाला पारधी समुदायाचा फास

## भर चौकात दिवस-रात्र लाजिरवाणा उच्छाद; पोशिंद्याचे अभय, कित्येकदा नेऊन सोडले तरी परततात इथेच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

शहराचे हृदयस्थळ राजकमल चौक परिसर हा गेल्या अनेक वर्षांपासून फासे-पारधी समुदायाच्या विविध टोळ्यांच्या विळख्यात आहे. दरम्यान अनेक दबंग अधिकारी महापालिकेत आयुक्त पदावर येऊन-बदलून गेले परंतु यापैकी एकही त्यांच्याच नाकावर टिच्चुन थेट महानगरपालिका मुख्यालयासमोरच ठाण मांडून असलेल्या फासे-पारधी टोळ्यांना येथून हटवू शकले नाहीत. परिणामी आता मस्तवाल झालेल्या या टोळक्यांनी दिवस-रात्र भर चौकातच लाजिरवाणा उच्छाद मांडला आहे. शहरात या टोळक्याचे पोशिंदे वाढल्यानेच त्यांना अनेकदा त्यांच्या मूळ गावी नेऊन सोडण्याची औपचारिकता केल्यावरही हे टोळके काही तासांतच पुन्हा येथेच परतून प्रशासनाला वाकोल्या दाखवत





कायम आहेत. आता सणसुदीचाकाळात तरी यांना या ठिकाणावरुण हटवा व् अंबानगरीच्या हृदयस्थळाला लागलेले हे फासे-पारध्यांचे ग्रहण सोडवा अशी मागणी अमरावतीकर नागरिक-व्यापारी-वाहनचालकांची आहे.

अमरावती शहरापासुन काही किलोमीटर दूर राजुरा बाजार व परिसरातील वस्त्यांतील निवासी फासे-पारधी समुदायाची ही टोळकी हिंसक वृत्तीची आहे. दिवसभर राजकमल ते श्याम चौक व राजकमल ते राजापेठ उडाणपुलाखाली घोळक्याने बसून दारू पिणे-पत्ते खेळणे-मोठ-मोठ्याने आरडा-ओरड करून आपसात मारामाऱ्या करणे, मटण बाजारात फेकलेल्या जनावरांचे अवशेष आणून रस्त्यावरच स्वयंपाक करणे, छोट्या-छोट्या बालकांना रस्त्यांवर उभे करून त्यांच्याकडून जबरी भीक मागवून घेणे. रस्त्याने जाणाऱ्या वाहनचालकांशी हुज्जत करणे, परिसरात-शहरात चोऱ्या करणे हाच या टोळ्यांचा नित्यक्रम आहे. सकाळी-दुपारी-संध्याकाळी-रात्री कधीही या परिसरातून गेल्यास येथे या फासे-पारध्यांचा उच्छाद नजरेस पडतो. बाहेर उघड्यावर राहूनही त्यांच्या छोट्या-छोट्या लेकरांकडे मोठ-मोठे अँड्रॉइड फोन आहेत. हे फोन चार्ज करण्यासाठी ते ठरलेल्या दुकानदारांना प्रतितास दराने पैसे देतात. दुचाकी-ऑटो रिक्षा-कटला अशी वाहनेही त्यांच्याजवळ आहेत. यापैकी प्रत्येक जण (महिलां-लेकरांसहित) नेहमीच नशेत बेधुंद दिसतात. पोलीस व मनपा प्रशासनही यास नाकारू शकत नाही.

पोशिंदे वाढल्याने उपद्रव वाढलाशहरातील श्याम चौक, तहसील कार्यालय परिसरात डझनभरपेक्षा जास्त भंगार खरीदी करणाऱ्यांनी रस्त्यावर अतिक्रमण केले आहे. हेच भंगार विक्रेते या फासे-पारधी टोळ्यांचे पोशिंदे बनले आहेत. सदर भंगार खरीदी दुकानांत केवळ याच समुदायाच्या लोकांचा माल मोठ्या प्रमाणात खरीदी होतो. चोरीचे साहित्यही बिनधास्त खरीदी करण्यातही ते मागे-पुढे पाहत नाहीत. हे भंगार विक्रेते या समुदायाला पैसे पुरवतात, त्यांचे मोबाईलही चार्ज करून देतात. गेल्या काही वर्षात हे पोशिंदे जास्तच वाढल्याने फासे-पारधी समुदायांच्या घोळक्यांचा उपद्रवही कमालीचा वाढला आहे. हे घोळके गावातून शहरात मोठ्या प्रमाणात गावठी दारूची आयात करून त्यांची विक्री दारू विक्रेत्यांना करतात हे हि अनेकदा झालेल्या पोलिसी कारवाईतून उघडही झालेले आहे.

### 'ते' भंगार विक्रेते हटवले तर शक्य

राजकमल चौकातील फासे पारधी समुदायांच्या घोळक्यांचा उपद्रव आता जास्तच वाढत आहे. यावर आवर घालण्यासाठी त्यांच्या पोशिंद्याना हटवणेही तितकेच गरजेचे आहे. त्यांचे पोशिंदे बनलेले श्याम चौक, तहसील परिसर व अन्य ठिकाणी वसलेले 'ते' सर्व भंगार विक्रेते हटवले तरच या फासे-पारधी समुदायाचा उपद्रव रोकणे शक्य आहे. तसा प्रस्ताव पोलीस उपायुक्त साळी यांच्यासह मनपा आयुक्त-उपायुक्तांनाही दिला आहे.

**– अजय सारस्कर, माजी नगरसेवक मनपा अमरावती.**

### सर्वत्र घाण करतात, चोऱ्या-माऱ्या नित्यक्रम

राजकमल चौक हा अमरावती शहराची शान असला तरी ती शान आता राहिलेली नाही. आता हा चौक पारध्यांचा चौक बनला आहे. हे घोळके त्यांना हटकणाऱ्या दुकानासमोर सर्वत्र घाण करून ठेवतात. चोऱ्या-मारामाऱ्या हा यांचा नित्यक्रम बनला आहे. अनेक वाहन चालकांसोबत हुज्जत करून त्यांनाही हि टोळी मारहाण करते. पोलीस ठाण्यातही त्यांच्या मारामाऱ्या सुरु असतात. यातून हत्या व अन्य मोठ्या घटनाही झाल्या आहेत.शहराच्या हितासाठी या टोळ्या शहरातून हद्दपार होणे अत्यावश्यक आहे.

**– गोकुल भोंडे, व्यवसायीक राजकमल चौक अमरावती.**

# ॲपचा वापर करून बुजवणार खड्डे:सार्वजनिक बांधकाम विभाग घेणार तक्रारींची दखल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणारे राज्यमार्ग आणि प्रमुख मार्गांवरील खड्ड्याच्या तक्रारी नोंदवण्यासाठी अँड्रॉइड प विकसित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या आधारे मार्गांवरील खड्डे बुजवले जाणार आहेत.

विशेषत: पावसाळ्याच्या दिवसात रस्त्यांवर मोठ – मोठे खड्डे पडण्याचे प्रमाण वाढते. खड्डे बुजवण्याच्या मागणीसाठी नागरिकांना आपल्या तक्रारी घेऊन संबंधित खात्याच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. दरम्यान, राज्यमार्ग आणि प्रमुख मार्गांवरील खड्ड्यांची माहिती देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अँड्रॉइड प तयार करण्यात आले आहे. या पवर नागरिकांना रस्त्यांवरील खड्ड्यांसंदर्भात घरबसल्या आपल्या तक्रारी नोंदवता येणार आहेत.

ॲपवरून मिळालेल्या माहितीच्या आधारे आमच्या विभागाकडून तक्रारींचे निराकरण करण्यात येईल आणि खड्डे मुक्ती योजना राबवण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता जगन दांदडे यांनी दिली. यापुढे रस्त्यांवरील खड्ड्यांची माहिती देण्यासाठी किंवा तक्रारी करण्यासाठी नागरिकांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात येण्याची गरज राहणार नाही, असेही दांदडे म्हणाले. पवरून प्राप्त होणाऱ्या तक्रारींबाबत तातडीने कार्यवाही करण्यात येईल आणि संबंधित राज्यमार्ग व जिल्हा मार्गावरील खड्डे बुजवण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.या पमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कामही सोपे झाले आणि नागरिकांनाही या बाबत तक्रार करण्यासाठी सोपा पर्याय मिळाला आहे.